रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ६
www.ramprahar.com
राम प्रहर
मंगळवार, २३ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

भरकटलेल्या पर्यटकांना सुखरूप डोंगरावरून उतरवले खाली/३
उरणच्या चिरनेरमध्ये जंगली वानरांचा धुमाकूळ/६
...म्हणून हार्दिकऐवजी सूर्यकुमार कर्णधार! -अजित आगरकर/८

## गायक राहत फतेह अली खान यांना दुबईत अटक?



**दुबई** : पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांना दुबई विमानतळावरून अटक करण्यात आली आहे. लाईव्ह परफॉर्मन्ससाठी ते दुबईला आले होते, मात्र विमानतळावर येताच अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. काही तासांच्या चौकशीनंतर त्यांना बुर्ज दुबई पोलीस ठाण्यात नेण्यात आले. मीडिया रिपोर्टनुसार माजी मॅनेजरच्या तक्रारीनंतर त्यांना अटक करण्यात आली आहे, मात्र काही वेळाने सोशल मीडियातून त्यांनी वृत्त नाकारले. राहत फतेह अली खान यांचा माजी मॅनेजर सलमान अहमदसोबत काही महिन्यांपासून वाद सुरू आहे. त्यांनी सलमानला नोकरीवरून काढून टाकले होते. यानंतर आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी सलमानने त्यांच्याविरोधात दुबईसह इतर काही ठिकाणीही तक्रार दाखल केली. दुबई विमानतळावर काही तासांच्या चौकशीनंतर खान यांना अटक करण्यात आली, मात्र त्यांनी हे वृत्त नाकारले आहे.

# आज सादर होणार केंद्रीय अर्थसंकल्प




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

*केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकारच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन मंगळवारी (दि. २३) अर्थसंकल्प २०२४-२५ सादर करणार आहेत. तत्पूर्वी त्यांनी देशाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल संसदेसमोर मांडला. लोकसभेत सादर झालेल्या या आर्थिक सर्वेक्षणात देशाचा विकास दर (जीडीपी) अंदाजे ६.५ ते ७ टक्क्यांपर्यंत असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.*

देशाच्या आर्थिक आरोग्याचे संपूर्ण चित्र मांडणाऱ्या या आर्थिक सर्वेक्षणात रोजगारासंदर्भातील डेटाही सादर करण्यात आला आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात झालेल्या वाढीबरोबरच कोरोना महामारीनंतर देशातील वार्षिक बेरोजगारीचा दरही कमी होताना दिसत आहे. मार्च २०२४मध्ये १५+ वयोगटातील शहरी बेरोजगारीचा दर ६.८% वरून आता ६.७% वर आला आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय भारतातील एकूण वर्कफोर्सपैकी सुमारे ५७ टक्के स्वयंरोजगार सुरू केला आहे. तरुणांचा बेरोजगारी दर २०१७-१८मधील १७.८% वरून २०२२-२३मध्ये १०%वर आला आहे, असेही या अहवालात म्हटले आहे.

या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी महिन्यात अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. नव्या १८व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन नुकतेच झाले. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, राष्ट्रपतींचे अभिभाषण आणि त्यावरील चर्चा पार पडली. त्यानंतर अधिवेशनाला विराम देण्यात आला. आता पुन्हा सोमवारपासून अधिवेशन सुरू झाले असून अर्थमंत्री निर्मला सीतारामन एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील अर्थसंकल्प मंगळवारी सादर करणार आहेत. सलग सातवेळा केंद्रीय अर्थमंत्री म्हणून अर्थसंकल्प मांडणाऱ्या त्या पहिल्याच व्यक्ती ठरणार आहेत.

# जात वैधता प्रमाणपत्रासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ

## आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारचा दिलासा



**मुंबई : प्रतिनिधी**

आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत.

राज्यातील अतिमागास प्रवर्ग, आर्थिक दुर्बल घटक, सामाजिक व आर्थिक मागास आणि ओबीसी प्रवर्गात पात्र ठरणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींकडून महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी आकारण्यात येणारे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले आहे, मात्र आरक्षणाच्या माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र सादर करावे लागते. त्यातही आता सरकारने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. त्यानुसार आता प्रवेश घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करता येईल.

या निर्णयानुसार २०२४-२५मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

राज्य सरकारने मोफत उच्च शिक्षणासंदर्भात घेतलेल्या निर्णयामुळे आरक्षणप्राप्त व ईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक संस्थांनी हे शुल्क आकारू नये, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून या संदर्भात शासन परिपत्रक जारी करण्यात आले आहे. त्यामुळे अभियांत्रिकीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही याचा लाभ होणार आहे. त्यातच उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्वच मुलींना प्रवेश परीक्षा, शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले आहे. त्यामुळे मुलींच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे, मात्र उच्च शिक्षणात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. महाविद्यालयातील प्रवेशावेळी हे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. आता राज्य सरकारने विद्यार्थ्यांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एसईबीसी प्रवर्गातील आरक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामीण भागात साधला कार्यकर्त्यांशी संवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २२) पनवेल ग्रामीणमधील भाजप कार्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत संवाद साधला. या भेटीदरम्यान त्यांनी सरकारने केलेली विकासकामे तसेच सरकारी योजनांची माहिती नागरिकांना देण्यासंदर्भात मार्गदर्शन केले.

पनवेलच्या धानसर, किरवली, धरणा, धरणा कॅम्प, रोहिंजण, खुटारी, पिसार्वे या ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची बैठक धानसर येथे भाजप तालुका चिटणीस सुरेश पोरजी यांच्या निवासस्थानी झाली. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, उपाध्यक्ष चाहूशेठ पाटील, चिटणीस सुरेश पोरजी, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष तथा शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, वॉर्ड अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे, बूथ अध्यक्ष जितेंद्र पोरजी, सुनील पाटील, श्रीपत पाटील, पांडुरंग पाटील, चंद्रकांत पाटील, रमेश पोरजी, श्रीपाद म्हात्रे, राजेश महादे, शशिकांत कदम, निहाल ठाकूर, बंडू गोंधळी, अमिर पोरजी, संतोष पाटील, अनंता पोरजी, रामू पोरजी, विठ्ठल गोंधळी, नरेश पोरजी, सुरज गोंधळी, अक्रम शेख, मकबूल शेख, सुधाकर पाटील, सागर घरत, प्रल्हाद भोईर, राजेश तांबोळी, महेश पोरजी, सलमान शेख, सर्वेश घरत, योगेश पाटील, निखिल पाटील, पार्थ पोरजी, सारथी पोरजी, विष्णू पोरजी, हरिश्चंद्र म्हात्रे, मिलिंद उलवेकर, संजय म्हात्रे, सतीश कदम, यशवंत गोंधळी, किशोर पोरजी, आवेश शेख, प्रतिक पोरजी, राहुल पोरजी, योगेश पाटील, महिला चंदा पोरजी, गौरी पोरजी, उज्वला पोरजी, सुनीता घरत, बेबी कवळे, शामल घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

## निवडक

### मनोरमा खेडकर यांना आता न्यायालयीन कोठडी

**पुणे** : वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. शेतकऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवल्याप्रकरणी त्यांच्यावर पुण्यातील पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस कोठडी संपल्यानंतर सोमवारी (दि. २२) त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. कोर्टाने त्यांची रवानगी आता न्यायालयीन कोठडीत केली आहे.

### झिका व्हायरससंदर्भात केंद्र सरकारकडून कमिटी स्थापन

**मुंबई** : महाराष्ट्र, गुजरात आणि केरळ तिन्ही राज्यात झिका व्हायरसचा प्रादुर्भाव वाढत आहे. याची दखल घेत केंद्र सरकारने एक कमिटी स्थापन केली आहे. ही कमिटी तिन्ही राज्यातील यंत्रणेसोबत बारकाईने काम करणार आहे. केंद्र सरकारने तिन्ही राज्यांना खबरदारीच्या उपाययोजना घेण्याची सूचना दिली आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर

## प्रशासनाकडून तयारी



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येत्या २८ ते ३० तारखेपर्यंत तीन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या वेळी कोल्हापूर, पुणे-मुंबईसह मराठवाड्यात लातूर आणि नांदेड शहरातील कार्यक्रमांमध्ये त्या उपस्थिती लावणार आहेत. राष्ट्रपती मराठवाड्यातील उद्‌गीरमध्ये बौद्ध विहाराच्या उद्‌घाटन समारंभास उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि. २२) प्रशासनाची बैठक झाली.

देशाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ३० जुलैला लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असणार आहेत. लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे उभारण्यात आलेल्या बुद्ध विहाराचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते होईल. यानंतर या ठिकाणी एका सभेचेही आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रपती मुर्मू पहिल्यांदाच लातूर जिल्ह्यात येत आहेत.

राष्ट्रपतींच्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी हजर राहणार आहेत. त्या अनुषंगाने प्रशासनाने कार्यक्रमासाठीची तयारी सुरू केली आहे. याबाबतची बैठक लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. उदगीरचे आमदार आणि कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे, भाजपचे आमदार संभाजी पाटील-निलंगेकर आणि लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत प्रशासनाची ही बैठक झाली.

# विवाहबाह्य संबंधातून गर्भवती महिलेसह मुलांचा भयानक अंत

**मावळ : प्रतिनिधी**

विवाहबाह्य संबंधातून गर्भवती राहिलेल्या महिलेसह तिच्या दोन लेकरांचा भयानक अंत झाला आहे. या तिहेरी हत्याकांडाने मावळ हादरले. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.

प्रियकराने महिलेला गर्भपात करण्यासाठी आपल्या मित्रासोबत कळंबोली येथे आणले होते. महिला २ व ५ वर्षाच्या मुलांना सोबत घेऊन आली, मात्र एका खासगी रुग्णालयात महिलेचा मृत्यू झाला. त्यानंतर प्रियकर आणि मित्र मृतदेह व मुलांना घेऊन पुन्हा मावळमध्ये आले. त्यांनी नदीत महिलेचा मृतदेह फेकला. त्यामुळे दोन्ही मुले रडू लागली. मग मुलांनादेखील जिवंतपणे नदीमध्ये टाकून दिले. अखेर याचा उलगडा झाला आहे.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# सोशल साईटवर लग्नाचे आमिष दाखवून तरुणींची लूट

## नेरळ पोलिसांकडून आरोपीला बेड्या

**नेरळ : प्रतिनिधी**

मॅट्रोमोनियल या सोशल साईटवर तरुणींशी ओळख करून त्यांना लग्नाचे आमिष दाखवून लुटणाऱ्या तरुणाला नेरळ पोलिसांनी विरार येथून ताब्यात घेतले आहे. सुमित कमलेश सैनी असे आरोपीचे नाव असून त्याने अविवाहित असल्याचे सांगून आतापर्यंत सुमारे १५ मुलींची फसवणूक केल्याची माहिती समोर आली आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील खांडा परिसरात राहणाऱ्या पीडित तरुणीने लग्न जुळवण्यासाठी शादी डॉट कॉम या मॅट्रोमोनियल साईटवर नाव नोंदविले होते. या साईटवर तिची विरारजवळ राहणाऱ्या सुमित सैनी या तरुणाची ओळख झाली. विवाहित असलेल्या सुमितने खोटी माहिती देत पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून ५२ हजारांना लुटले. एवढेच नव्हे तर त्याही पुढे त्याने पीडितेकडे व्हॉट्सअ‍ॅपवर न्यूड फोटो तसेच सेक्सची मागणी केली होती.

आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्याने पीडितेने नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आणि विरारजवळील अ‍ॅक्रोपॉलीस बिल्डिंगमधून सुमित



सैनीला ताब्यात घेतले. त्याने आतापर्यंत अशाच प्रकारे १२ ते १५ तरुणींची फसवणूक करीत लाखो रुपये लुटल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# उच्चशिक्षित उमेदवार रायगड पोलीस दलातील विविध पदांच्या भरतीसाठी रांगेत

## सनदी लेखापाल, वकील, एमबीए, पदवीधारकांचा समावेश

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

सनदी लेखापाल, वकील, इंजिनिअर्स, एमबीए, बी फार्म, एम फार्म, बीटेक, एमटेक, एमएसडब्ल्यू अशा पदवी असलेले उच्चशिक्षित उमेदवार रायगड पोलीस दलातील विविध पदांच्या भरतीसाठी रांगेत उभे होते. उच्चशिक्षितही पोलीस भरतीकडे वळल्याने बारावी, बीए, एमए, बीकॉम पदवी घेतलेल्या उमेदवारांची भलतीच अडचण झाली आहे.

रायगड पोलीस दलातील ४२२ जागांसाठी भरती प्रक्रिया सध्या सुरू आहे. यात ३९१ पोलीस शिपाई, नऊ बॅण्ड्समन पोलीस शिपाई आणि ३१ चालक पोलीस शिपाई पोलीस पदांचा समावेश आहे. राज्यभरातून यासाठी ३१ हजार उमेदवारांनी अर्ज केले आहेत. सध्या या उमेदवारांची शारीरिक चाचणी सुरू आहे. आतापर्यंत जवळपास २५ हजार उमेदवारांची शारीरिक चाचणी पूर्ण झाली असून सहा हजार उमेदवारांची चाचणी अद्याप शिल्लक आहे.

पोलीस शिपाई पदासाठी शैक्षणिक अर्हता ही बारावी पास आहे. तरीही या भरतीसाठी हजारो उच्च आणि अति उच्चशिक्षित तरुणांनी अर्ज केले आहेत. तब्बल ११ हजार २३३ उच्च आणि अति उच्चशिक्षित आहेत. बॅचलर ऑफ इंजिनिअरींगचे शिक्षण घेतलेल्या १८६ उमेदवारांनी पोलीस शिपाई पदासाठी अर्ज केले आहेत. त्या पाठोपाठ बी.टेक पदवीप्राप्त ७७ विद्यार्थी आहेत. एमबीए अर्थात व्यवस्थापन शाखेत पदवीप्राप्त चार विद्यार्थ्यांनी या पदासाठी अर्ज केला आहे. एमसीए १०, बी. फार्मसी ३५, एम. फार्मसी दोन, बीसीए १०६, बीबीए १५, एमएसडब्ल्यू १८, बीएस्ससी अ‍ॅग्री १६२ व बीएसडब्ल्यू १२, सनदी लेखापाल पदाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या एका, तर सहा एलएलबी पदवीधारकांनी पोलीस शिपाई पदासाठी अर्ज करून शारीरिक चाचणी दिली आहे.

कला शाखेच्या पाच हजार ७९१ पदवीधारकांनी, तर पदव्युत्तर पदवी घेतलेल्या ५८९ जणांनी अर्ज केले आहेत. वाणिज्य शाखेचे दोन हजार ४६ पदवीधर भरतीसाठी हजर झाले आहेत. विज्ञान शाखेतून एक हजार ७७३ पदवीधारक आणि पदव्युत्तर पदवी घेतलेल्या १६६ जणांनी भरतीसाठी हजेरी लावली आहे.

# रायगडातील ५९ शाळाबाह्य, स्थलांतरित मुले शिक्षणाच्या प्रवाहात

## जि.प.च्या विशेष शोधमोहिमेला यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील ३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य, स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागामार्फत शाळाबाह्य मुलांची विशेष शोधमोहीम ५ ते २० जुलैदरम्यान राबविण्यात आली. या मोहिमेत ३७ शाळाबाह्य तसेच २२ स्थलांतरित मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकन, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, नवोदय परीक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांमार्फत शाळांमध्ये सुरू आहे. शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहेत. अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या मोहिमेत घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याव्यतिरिक्त बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंब, जिल्ह्यातील सर्व खेडी, गाव, वाड्या, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षणगृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य, स्थलांतरित विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला.

या शोधमोहिमेत १८ मुले, १९ मुली अशी एकूण ३७ शाळाबाह्य मुले सापडली असून या सर्व मुलांना जवळच्या जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देण्यात आला आहे तसेच इतर जिल्ह्यातून रायगडात स्थलांतरित होऊन आलेले १६ मुले व सहा मुली अशा एकूण २२ मुलांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला नसल्याचे दिसून आले. या मुलांनाही शाळेत दाखल करून घेण्यात असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली.

# विदर्भात मुसळधार पावसाने हाहाकार!

## कोल्हापूर, सांगली, लातूरही जलमय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. विदर्भात तर पावसाने हाहाकार माजवला असून तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

याशिवाय कोल्हापूरमध्ये गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. पंचगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून पूराचे पाणी गावांमध्ये शिरले आहे. जिल्ह्यातील ८६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. कोल्हापूरमधील पूरसदृश्य परिस्थिती लक्षात घेता एनडीआरएफची टीम दाखल झाली आहे. नागरिकांनी काळजी घ्यावी आणि सतर्क राहावे असे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. कोल्हापूर शहरातही नदीचे पाणी आले असून अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे. सध्या कोल्हापूर-रत्नागिरी, कोल्हापूर-गगनबावडा राज्यमार्गावर नदीचे पाणी आले आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यालादेखील पावसाने झोडपून काढले आहे. जिल्ह्यातल्या जळकोट तालुक्यातील तिरू नदीवरील पर्यायी पूल वाहून गेला आहे. पुलावरून



असलेली वाहतूक बंद झाल्याने जवळपास २८ गावांचा संपर्क तुटला आहे.

सांगलीच्या कृष्णा नदीची पाणीपातळी झपाट्याने वाढत असून महापालिका प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजनांना सुरुवात करण्यात आली आहे. पूरपट्ट्यात पहिल्यांदा बाधित होणाऱ्या भागातील नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या. अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ यांच्यासह महापालिकेच्या टीमकडून सांगलीतील जामवाडी, सूर्यवंशी प्लॉट आदी परिसरात जाऊन तेथील नागरिकांना खबरदारीच्या सूचना दिल्या. पाण्याची पातळी अचानक वाढली तर कोणतीही जीवितहानी होऊ नये, याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना केल्या. पाणीपातळी वाढली तरी महापालिकेच्या तात्पुरता निवारा केंद्रात स्थलांतरित व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. भंडारा जिल्ह्यातील पवनी, लाखांदूर तालुक्यात रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. तालुक्यांचा संपर्क तुटला असून पवनी तालुक्यातील आसगावला पुराच्या पाण्याने वेढा पडला आहे. यामुळे गावातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

# गर्भपात करताना प्रेयसीचा मृत्यू

## मृतदेहासह दोन्ही चिमुकल्यांनाही नदीत फेकले

**पुणे : प्रतिनिधी**

विवाहबाह्य संबंधातून गर्भवती राहिलेल्या प्रेयसीचा गर्भपात करताना मृत्यू झाला. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावताना प्रेयसीच्या दोन्ही मुलांना इंद्रायणीच्या नदीपात्रात जिवंत फेकून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना ९ जुलै रोजी घडली असून याप्रकरणी प्रियकर आणि त्याच्या मित्राला तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

गर्भवती प्रेयसीचा गर्भपात करण्यासाठी ६ जुलै रोजी रुग्णालयात आणण्यात आले होते. गर्भवती प्रेयसीसह तिच्या पाच आणि दोन वर्षीय मुलाला घेऊन प्रियकर गजेंद्र दगडखैर कळंबोली येथे गेला. तेथील अमर रुग्णालयात प्रेयसीचा गर्भपात करण्यात आला, मात्र डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे प्रेयसीचा ८ जुलैला मृत्यू झाला. त्यानंतर गर्भपात करून देणाऱ्या एजंट महिलेने मध्यस्थी करीत मृतदेह गजेंद्रचा मित्र रविकांत गाईकवाडच्या सोबतीने मावळमध्ये आणला. गजेंद्र आणि रविकांतने ९ जुलैच्या अंधारात इंद्रायणी नदीच्या वाहत्या प्रवाहात मृतदेह फेकून दिला. नंतर प्रेयसीची



दोन्ही मुले रडू लागली. आता या दोघांमुळे आपले बिंग फुटेल, या भीतीने त्या दोन्ही मुलांनाही त्याच नदीच्या प्रवाहात जिवंत फेकून दिले.

दरम्यानच्या काळात प्रेयसीसोबत तिच्या कुटुंबियांचा संपर्क होत नसल्याने, त्यांनी तळेगाव एमआयडीसी पोलिसांत तिघे हरवल्याची तक्रार दिली. पोलिसांनी तपासाची चक्र फिरवली. प्रेयसीला गजेंद्रने अनेकदा फोनवरून संपर्क साधल्याचे आणि गजेंद्रने मित्र रविकांतशी त्याच दरम्यान फोनवर अनेकदा बोलल्याचे तपासात समोर आले. या दोघांची पोलिसांनी अनेकदा कसून चौकशी केली, मात्र दोघे ही उडवाउडवीची उत्तरे देत होती.

शेवटी पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर दोघांनी घडला प्रकार कबूल केला. तळेगाव पोलिसांनी या दोघांना बेड्या ठोकल्या असून पुढील कारवाई सुरू आहे.

# अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील वेदरशेड उडाली

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यारील वेदरशेड सोमवारी (दि. २२) पहाटे सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उडाली. शनिवारी सकाळपासून अलिबाग व आसपासच्या परिसराला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. सोमवारी पहाटे सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील वेदरशेड उडाली.

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर आलेल्या पर्यटकांचे उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून दोन ठिकाणी वेदरशेड उभारण्यात आली होती. या शेडमुळे उन्हाळ्यात व पावसातदेखील पर्यटक समुद्रकिनाऱ्यावर बसू शकत



होते. यापैकी एका बाजूची वेदरशेड उडाली. ही शेड उडाल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होणार आहे.

हवामान खात्याने रायगड जिल्ह्यासाठी सोमवारी रेडअलर्ट दिला होता. पहाटे जारदार पाऊस झाला, परंतु त्यानंतर पावसाने विश्रांती घेतली. सोमवारी सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासांत रायगड जिल्ह्यात ९५.९१ मिमीच्या सरासरीने पाऊस पडला. उत्तर रायगडातील पनवेल, उरण, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये १०० मिमीपेक्षा जास्त सरासरीने पाऊस पडला. महाड, पोलादपूर, म्हसळामध्ये पावसाचा जोर होता.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. रविवारी (दि.२१) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ८७ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ६४ हजार ८०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.



## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द**

ता. खालापुर, जि. रायगड

सर्व बांधकाम ठेकेदार व पुरवठादार यांस जाहिर निविदाद्वारे कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द ता. खालापुर, जि. रायगड यांजकडुन ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी कामाच्या अनुभविक इच्छुक जी.एस.टी. धारक ठेकेदारांकडुन व पुरवटा धारकांकडुन लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत व पुरवठाधारकांनी ज्या वस्तु पुरवायचे आहेत त्यांनी आपली निविदा दि. २३/०७/२०२४ पासुन दि. २९/०७/२०२४ पर्यंत सकाळी ठिक १०.०० वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि. ३०/०७/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.३० वा. मा. सरपंच व सदस्य व ठेकेदार / पुरवठादार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा आधिकार मा. सरपंच यांनी राखुन ठेवलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | याजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | घराच्या गटासाठी सामुदायिक शोश खड्डे तयार करणे (ग्रा.प. हद्दीत सर्व गावात ) | १०००००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २३-२४ | १०००/- | ६ महिने |
| २. | कुटुंबांच्या गटासाठी सामुदायिक कपोष्ट खड्डे तयार करणे (ग्रा.प. हद्दीत सर्व गावांत ) | १०००००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २३-२४ | १०००/- | ६ महिने |
| ३. | सार्वजनिक संस्थाना पाईपद्वारे पाणी पुरवठा करणे प्रा.शाळा बीडखुर्द अंगणवाडी केळवली बीडखुर्द | ७५०००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २३-२४ | ७५०/- | ६ महिने |
| ४. | पिण्याचे पाण्याचे स्त्रोतांचे क्लोरीकरण करणे (TCL मेडीक्लोर बॉटल खरेदी) | ५९७६०/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | ५९७/- | ३ महिने |
| ५. | सौर पथदिवे खरेदी | ८००००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | ८००/- | ३ महिने |
| ६. | पथदिवे खरेदी | ५००००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | ५००/- | ३ महिने |
| ७. | विविध उपकरणांची खरेदी (ग्रास कटर मशीन खरेदी) | ३००००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | ३००/- | ३ महिने |
| ८. | कौशल्य विकास प्रशिक्षण | १०००००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | १०००/- | ३ महिने |
| ९ . | ग्रा.प.हद्दीतील सर्व गावांतील गटार साफसफाई करणे | ८००००/- | ग्रामनिधी २४-२५ | | ६ महिने |

**अटी शर्ती :-**

१. सदर कामाची कोरी निविदा दिनांक २३/०७/२०२४ ते २९/०७/२०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२. निविदे सोबत एक टक्का इसारा रक्कम ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे किंवा रोखीने ग्रामंपचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी.
३. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु. च्या बाँड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
४. सदरचे काम पंचायत समितीकडील संबधित तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखेखाली पुर्ण करण्याचे आहे.
५. काम पुर्ण झाल्यावर कामाच्या बिलातुन ५ टक्के सुरक्षा अनामत, २ जी.एस.टी., २ टक्के आयकर, १ टक्का कामगार कल्याण, १ टक्का कामगार विमा इत्यादी रकमा कपात केल्या जातील.
६. ठेकेदार हा अनुभवी व GST धारक असावा.
७. सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहुन ६ महिन्याने परत केली जाईल.
८. कामाचे वेळी काही जीवीतहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पुर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

दि. २३/०७/२०२४

**सही/-**
**ग्रामसेवक**
ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द

**सही/-**
**सरपंच**
ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द



# ‘कुष्ठरुग्णांसाठी पुन्हा संसदेत विशेष याचिका दाखल करणार’

**पनवेल : प्रतिनिधी**

कुष्ठरोगग्रस्तांसाठी पुन्हा एकदा संसदेत विशेष याचिका दाखल करणार असल्याची घोषणा जयपूरमधील राष्ट्रीय अधिवेशनात माजी राज्यपाल राम नाईक यांनी केली. सार्थक मानव कुष्ठाश्रमाद्वारे आयोजित या अधिवेशनात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या वेळ बोलताना राम नाईक यांनी विविध कुष्ठरोगग्रस्त संघटनांसह २००८ साली आपण राज्यसभेत विशेष याचिका दाखल केली होती याची आठवण करून दिली. त्या वेळी राज्यसभेच्या याचिका समितीने विविध



केंद्रांचा अभ्यास करून एक अहवाल तयार केला होता. २०१०मध्ये त्यावर ॲक्शन टेकन रिपोर्टदेखील आला. या अहवालानुसार आरोग्य मंत्रालयाने १६ कायद्यात सुधारणा करण्याची सूचना केली होती. अद्यापही या अहवालातील अनेक बाबी कार्यान्वित झालेल्या नाहीत, अनेक राज्यांमध्ये अजूनही कुष्ठरोगग्रस्तांना भत्ता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा राज्यसभेत याचिका दाखल करण्याचे जाहीर केले आणि विविध संस्थांना एकत्र येण्याचे आवाहन केले.

सार्थक मानव कुष्ठाश्रमचे संरक्षक डॉ. के.एल. जैन, अध्यक्ष सुरेश कौल, भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे संस्थापक डी. आर. मेहता, राज्य कुष्ठरोग अधिकारी डॉ. विजयलक्ष्मी गोदारा, ’अपल’च्या अध्यक्ष माया रणावरे, आयएलपी इंडियाचे डॉ. श्रीलेखा पेना, इंटरनॅशनल लेप्रसी यूनियनचे शरद भोसले, स्पानोंचे डॉ. अमिताभ, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे उपाध्यक्ष जितेंद्र चव्हाण उपस्थित होते.

# समुद्रकिनाऱ्यांची यांत्रिक पद्धतीने होणार साफसफाई

## रायगडमध्ये चार अत्याधुनिक मशिन दाखल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यातील समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने पुढाकार घेतला आहे. समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता यांत्रिक पद्धतीने होणार आहे. रायगड जिल्ह्यासाठी चार अत्याधुनिक मशिन दाखल झाले आहे.



समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता राखणे स्थानिक प्रशासनासाठी मोठे जीकिरीचे काम होते. मनुष्यबळाचा वापर करून विस्तीर्ण किनाऱ्यांची स्वच्छता राखणे अशक्य ठरत होते. प्रामुख्याने पावसाळयात समुद्रातील कचरा मोठ्या प्रमाणात किनारपट्टीवर वाहून येतो. सामाजिक संस्थांच्या मदतीने अधून मधून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता मोहीम राबविली जात होती, मात्र यात सातत्य राखणे अवघड असल्याने किनारे अस्वच्छ राहण्याचे प्रमाण मोठे होते.

ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळाने पहिल्यांदाच समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घेतला आहे. किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी अधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली आहे.

रायगड जिल्ह्यासाठी चार मशिन्स उपलब्ध झाली असून श्रीवर्धन, नागाव, किहीम आणि काशिद या चार समुद्रकिनाऱ्यांवर ही मशिन्स दिली जाणार आहे. स्थानिक ग्रामपंचायती अथवा नगर पालिकांना या मशिन्सच्या व्यवस्थापनाचा खर्च करावा लागणार आहे. देखभाल दुरूस्ती कंपनीच्या माध्यमातून केली जाणार आहे. कोकण किनारपट्टीवरील सात जिल्ह्यासाठी सात बीच टेक कंपनी ट्रॅक्टर रवींद्र शेवाळे, ओंकार पाठक, पाम टेक कंपनीचा मॅनेजर श्रीवर्धन, नागाव, किहीम आणि काशिद या चार ठिकाणी देणार आहेत. या मशिनच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता केली जाईल.

कचरा उचलणे, त्याचे संकलन करणे, संकलित केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाळूत साचलेल्या कचऱ्याचे संकलन करणे, वाळूचे सपाटीकरण करणे यांसारखी कामेही केली जाऊ शकणार आहेत. यंत्राच्या देखभाल दुरूस्तीचा खर्चही कंपनीच्या माध्यमातून केला जाणार आहे.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड** : राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरीता मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या लाभासाठी पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक दुर्बलतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. आवश्यक साधने खरेदी करण्याकरीता तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्राद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत ३००० रु. त्याच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येतील. योजनेबाबत अधिक माहिती व योजनेचे अर्ज प्राप्त करण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कच्छिभवन, नमिनाथ जैन मंदिराजवळ, अलिबाग, या कार्यालयाशी संपर्क साधावा.



**सिडको** शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे हक्कसोडपत्रक प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तीचे नाव | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा - १०४१ | पेंधर- १/२००८ | २५२/१/५/२ २५२/२/२ | ०-४७-० १-०१-५ | **१२९९ पूर्णांकात १३०० चौ.मी.** | **भूखंड क्र. ४३A, सेक्टर ०५, क्षेत्र- १३०० चौ.मी., नोड-तळोजा** | १)विनय दिलीप साळुंखे २) सुशिल दिलीप साळुंखे ३) स्वाती शरद साळुंखे ४)वर्षा शरद साळुंखे उर्फ वर्षा तृषात भोसले ५) सुलभा मारूती चव्हाण **हे दुसरेपक्षीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. १०९८१/२०१९, १०९८२/२०१९, १०९८३/२०१९ या हक्कसोडपत्र प्रमाणे १) नितीन दिलीप साळुंखे २) प्रविण शरद साळुंखे ३) विनायक धारू साळुंके **यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत.** |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण** :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, १२.५% (भुमी) तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/१०७/२०२४-२५

## निवडक

### रसायनीत महिलेची आत्महत्या

**मोहोपाडा :** दुर्गामाता कॉलनीतील श्री योग सोसायटीत राहणाऱ्या तनुश्री संकेत ओमले (वय २७) या महिलेने गळफास लावून आत्महत्या केली. तनुश्रीने राहत्या सोसायटीतील टेरेसचे वरील पत्र्याच्या शेडचे आडव्या लोखंडी पाईपाला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून रविवारी (दि.२१) रात्री जीवनयात्रा संपविली. तिच्यावर चौक ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात नोंद झाली असून वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला उपनिरीक्षक शिंदे अधिक तपास करीत आहेत.

### वडघर किनारी आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरातील कोळवाडा वडघर खाडी किनारी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फूट, चेहरा गोल, अंगाने मध्यम, डोक्याचे व दाढीचे केस काळे पांढरे व वाढलेले, कपाळ मोठे, नाक सरळ, दोन्ही हातामध्ये जर्मन व पितळेचे मनगट कडे असून अंगात राखाडी व हिरवा शर्ट व निळी जिन्स पॅन्ट तसेच दोन पायामध्ये जांभळी प्लास्टीकची चपल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पो. उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे (९८२३०४७१६१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### स्वामी समर्थ मठात गुरूपौर्णिमा

**पनवेल :** शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे सालाबादप्रमाणे यंदाही गुरूपौर्णिमा उत्सव



सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमाद्वारे झाला आहे. यामध्ये त्यामध्ये प्रामुख्याने पहाटे श्रींची काकड आरती, नित्य नैमित्यिक पुजा प्रसाद, लघु रुद्र पुजा, श्रींची आरती व प्रसाद, श्री दत्त गायत्री होम हवन, सद्गुरु पाद्य पुजा त्याचप्रमाणे श्री स्वामी समर्थ महिला मंडळाचे भजन तसेच सायंकाळी श्रींची महाआरती, महाप्रसाद, गुरुमंत्र प्रदान कार्यक्रम व श्री स्वामी समर्थ मंडळातर्फे भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे येणाऱ्या स्वामी भक्तांसाठी व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था आगरी समाज हॉल पनवेल येथे करण्यात आली होती. हा सोहळा निमंत्रक सुधाकर (भाऊ) घरत व अवधूत सुधाकर घरत यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

# चर्चमधील चोरीचे गुन्हे उघडकीस

## पनवेल पोलिसांकडून दोन आरोपींना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात दोन चर्चमध्ये झालेले दोन चोरीचे गुन्हे पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने उघडकीस आणले आहेत व या प्रकरणी दोन नेपाळी सराईत चोरट्यांना अटक केली आहे.

शहरातील ओरियन मॉलच्या मागे असलेल्या संत फ्रान्सिस झेवियर चर्च येथे झालेल्या चोरीमध्ये तेथील दानपेटी फोडून अंदाजे ५० हजार रुपये रोख चोरून नेण्यात आले होते. त्याचप्रमाणे शहरातील लाईन आळी येथील सेंट फ्रान्सिस न्यू चर्च येथेही चर्चच्या पाठीमागील दरवाजा तोडून तेथील कपाटात असलेल्या दान पेटीमधील रोख रक्कम पाच हजार रुपये चोरून





नेण्यात आले होते.

याबाबतच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, नाईक विनोद देशमुख आदींच्या पथकाने गुप्त बातमीदाराद्वारे व तांत्रिक तपासाच्या आधारे सराईत आरोपींना ताब्यात घेतले. अग्र धनबहाद्दुर बिष्ट उर्फ पवन (३८ रा.तळोजा गाव) व धनबिरे राहुले विसुक्रमा (३१ रा.तळोजा गाव) अशी आरोपींची नावे असून त्यांच्याकडे अधिक तपासात हे दोन्ही गुन्हे उघडकीस आणले आहेत. यांच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविली आहे.

# खारघरमध्ये सोसायटीची सुरक्षा भिंत कोसळली



**पनवेल : वार्ताहर**

गेल्या दोन दिवस मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. काही घरात पाणी शिरले असुन खारघर सेक्टर ५मधील कावेरी सोसायटीची सुरक्षा भिंत कोसळल्याने सोसायटीमधील तीन विंगमधील ५६ फ्लॅटधारकांना धोका निर्माण झाला आहे.

खारघर हिल वरून वाहून येणाऱ्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाहाच्या जोरामुळे ही भिंत वाहून गेली आहे. २२६ फ्लॅट्स असलेल्या या चार मजली सोसायटीच्या जी, एच आणि आय या तीन विंगमधील ५६ फ्लॅटधारकांना यामुळे धोका निर्माण झाला असुन या रहिवाशांना सोसायटीच्या इतर सुरक्षित भागात स्थलांतरित करण्यात आले आहे.

ही बाब स्थानिक पोलीस प्रशासन, पालिका आणि सिडको प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर पालिकेचे आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल झाले. पालिकेची पाच जणांची टीम याठिकाणी कार्यरत राहणार आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनीदेखील घटनेचा आढावा घेत तत्काळ प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांना घटनास्थळी भेट देण्याची सूचना करीत गरज भासल्यास येथील रहिवाशांना पालिकेच्या शाळेत सुरक्षित रित्या स्थलांतरित करण्याच्या सूचना दिल्या.

अतिवृष्टीमुळे सोसायटीची सुरक्षा भिंत वाहून गेली असून मागच्या वर्षीदेखील अशीच घटना घटना घडली असल्याचे कावेरी सोयायटीचे अध्यक्ष शुभम जाधव यांनी सांगितले. सोसायटीच्या तीन विंग ला लागुन असलेल्या या सोसायटीतील ५६ फ्लॅट धारकांना तात्पुरते स्वरूपात सोसायटीच्या भागात स्थलांतरित करण्यात आले असुन आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार या रहिवाशानाच्या सुरक्षेची काळजी घेतली जाणार आहे. या रहिवाशांची जेवणाची व्यवस्था पालिका करणार असल्याची माहिती प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी दिली.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊ गणपत सिनारे यांच्या पत्नी रतीबाई सिनारे यांचे नुकतेच निधन झाले. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिनारे कुटुंबीयांच्या घरी सांत्वनपर भेट दिली. या वेळी कृष्णा सिनारे, भगवान सिनारे, केशव सिनारे, रमेश पाटील, विलास भोपी, नवनाथ भोपी, भालचंद्र भोपी, राजेश भोपी व सिनारे कुटुंबीय उपस्थित होते.**



**पनवेल : श्री गुरूपौर्णिमाच्या मुहूर्तावर नवीन पनवेल येथे डॉ. संदीप राजपूत व डॉ. उषा राजपूत यांच्यामार्फत न्यू केअर प्लस आयुर्वेद हॉस्पिटल सुरू करण्यात आले. पनवेल परिसरातील हे सुसज्ज असे पंचकर्म सुविधा, क्षारसूत्र विभाग, बेड क्षमता असलेले पहिले हॉस्पिटल आहे. बाल दमा, संधिवात, वंध्यत्व, गठ्ठीयावात, मधुमेह, मूत्रविकार, पोटाचे विकार इतर विकारांवर आयुर्वेद चिकित्सा पद्धतीनुसार चिकित्सा येथे केली जाते. तसेच पंचकर्ममधील वमन, विरेचन, बस्ती, नस्य, रक्तमोक्षण, शिरोधारा, उत्तर बस्ती, मुख लेप, उद्वर्तन, कपींग, जलोकावचरण, विद्ध कर्म, इतर आयुर्वेदिक उपचार पद्धतीही या ठिकाणी उपलब्ध आहे.**

# नांदगावजवळ भरकटलेल्या पर्यटकांना डोंगरावरून सुखरूप उतरवले खाली



**पनवेल : वार्ताहर**

नांदगावजवळील पाच पीर डोंगर निसर्ग हॉटेलच्या मागे डी पॉईंट येथे नेरूळ परिसरात राहणारे एक कुटुंब व त्यांचा मित्र परिवार असे आठ जण ट्रेकींगसाठी गेले असता ते मुसळधार पाऊस व धुक्यामुळे भरकटले होते, परंतु स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने पनवेल शहर पोलिसांनी या आठही जणांना रेस्न्यु करून सुखरुपपणे खाली उतरविले आहे.

नेरूळला राहणारे पवार कुटुंबिय व त्यांचा मित्र परिवार असे आठ जण आज सकाळी ११च्या सुमारास पनवेल शहराजवळील नांदगाव जवळील पाच पीर डोंगरावर ट्रेकींगसाठी गेले होते, परंतु दुपारच्या वेळेस अचानकपणे वाढलेला पाऊस व दाट धुक्यामुळे ते रस्ता चुकले व भलत्याच ठिकाणी पोहोचले. आपण वाट चुकल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी आपत्कालीन विभागाशी संपर्क साधला. तत्काळ विभागाने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क साधून अडकलेल्या आठ जणांबाबत माहिती दिली.

यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, सहाय्यक निरीक्षक निरीक्षक केदार, उपनिरीक्षक विनोद लबडे, हवालदार किशोर बोरसे, परेश म्हात्रे, मुरली पाटील, नाईक भाऊसाहेब लोंढे, यांच्यासह नांदगांवचे माजी सरपंच संजय पाटील, अ‍ॅड. घरत व ग्रामस्थ त्यांच्या मदतीला धावले व त्यांनी डोंगर पिंजून काढून दोन तासानंतर या आठ जणांना ताब्यात घेवून सुखरुपपणे खाली उतरविले. याबद्दल या आठ जणांनी पनवेल शहर पोलीस व ग्रामस्थांचे आभार मानले आहेत.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, रंग काळा सावळा, उंची अंदाजे साडेपाच फूट, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस काळे पांढरे व वाढलेले, कपाळ रूंद, नाक सरळ असून अंगात शर्ट व निळा बरमुडा घातलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे (९८२३०४७१६१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





**पनवेल : मुसळधार पावसामुळे रविवारी शहरातील रोहिदासवाडा येथील म्हात्रे यांच्या घरात पाणी शिरले होते तसेच लाईन आळी जयरत्न बिल्डिंगसमोर पाटील यांच्या घरातही पावसाचे पाणी शिरले होते. महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना ही बाब समजताच त्यांनी तत्काळ पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून म्हात्रे व पाटील यांच्या घरातील पावसाचे पाणी पंपाच्या सहाय्याने काढले. यासोबतच मिडलक्लास सोसायटीमध्ये वाऱ्या वादळामुळे मोठे झाड पडून रस्ता बंद झाला होता. दर्शना भोईर यांनी तत्काळ संबंधित विभागाकडून झाड हटवून रस्ता मोकळा करून घेतला.**

## पिरकोन-सारडे रस्त्यावर आढळला तरुणाचा मृतदेह

**उरण : प्रतिनिधी**

पिरकोन-सारडे रस्त्यावर तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या संदर्भात उरण पोलिसांनी याबाबत चौकशी केली असता मृतदेह पनवेल तालुक्यातील केळवणे गावातील रहिवासी राजेश हरिदास ठाकूर (वय ४०) या स्थानिक तरुणाचा असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तनुसार, राजेश हरिदास ठाकूर हा तरुण आपली पत्नी व तीन लहान मूली सोबत केळवणे या आपल्या गावात राहत असून आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी जेएनपीए बंदर परिसरात कँटिनचा व्यवसाय करीत होता. राजेश कोप्रोली नाक्यावर सामान घेत असल्याचे त्यांनी आपल्या पत्नीला सांगितले, परंतु बराच वेळ होऊनही आपला पती राजेश घरी का आला नाही. याची माहिती आपल्या नातेवाईकांना राजेशच्या पत्नीने दिली. शोध घेतला असता राजेशचे सामान सारडे रस्त्यावर आढळून आले. याशिवाय रस्त्याच्या कडेला राजेश मृत अवस्थेत पडलेला आढळून आला.

उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जागेचा पंचनामा करून राजेशला इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता राजेश हा तरुण मयत झाला, मात्र राजेश ठाकूर यांचा मृत्यू कशामुळे झाला यासंदर्भात जनमानसात तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. तपास सुरू आहे.

## सीकेटी विद्यालयात गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातर्फे गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संगीत शिक्षिका अर्चना पाटील व संगीत शिक्षक संतोष खरे यांनी मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक सुभाष गणपत मानकर यांनी प्रमुख अतिथींचे व मान्यवरांचे बुके देऊन स्वागत केले. कार्यक्रमादरम्यान शालेय स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते झाला. काही विद्यार्थ्यांनी श्लोक गुरू शिष्यांच्या गोष्टी सादर केल्या. सर्व सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांनी भेटवस्तू दिल्या.

कार्यक्रमासाठी रोटरी क्लब पनवेल महानगर अध्यक्ष पुरण सिंह मेहरा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष अर्चना पाटील, सहसचिव निलेश गुंड, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख अतिथी मेहरा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी मान्यवरांचे आभार मानले.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा सीडबॉल निर्मितीचा उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे सोमवारी (दि.२२) पेठपाडा मेट्रो स्टेशनजवळील शेतात सीडबॉल बनवण्याचा पर्यावरणीय उपक्रम घेण्यात आला.

या वेळी विज्ञान शाखेतील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी काळी माती, शेणखत, गांडुळखत एकत्र करून त्यांचे गोळे (सीड बॉल) तयार केले यामध्ये प्रामुख्याने गुलमोहोर, कडूलिंब, सिसव, बदाम, अशोका इ. झाडांचे बी सुरक्षित ठेऊन शंभर ते दोनशे सीड बॉलची निर्मिती केली तसेच त्यांनी हे सीड बॉल नियोजनबध्द पध्दतीने डोंगर रांगावर तसेच शहराच्या आजुबाजूच्या परिसरात टाकले. या मातीच्या गोळ्यामध्ये असलेले बीज आपोआपच फुटू लागतात आणि हळूहळू निसर्गाच्या साहाय्याने ते बीज एक रोप बनेल हा पर्यावरण रक्षणासाठी एक नवा उपक्रम आहे.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे या पर्यावरणीय उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्याबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर यांनी केले तसेच इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## भारतीय प्रज्ञाशोध परीक्षेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. सिद्धिविनायक एज्युकेशन सोसायटी-कोल्हापूर आयोजित भारतीय प्रज्ञाशोध परीक्षा-२०२४ ही परीक्षा फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आली होती. या स्पर्धा परीक्षेत नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देदिप्यमान यश प्राप्त केले आहे.



नुपूर निलेन्द्र गावडे (जिल्ह्यात प्रथम), ईश्वरी संतोष जगताप (जिल्ह्यात तृतीय), आराध्य अनंत जाधव (तालुका स्तर प्रथम), अद्वेत निलेश मोकल (तालुका स्तर द्वितीय), श्रेया अशोक जानकर (तालुका स्तर तृतीय), दीप महेश कार्णेकर (तालुका स्तर उत्तेजनार्थ) या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकाविले आहे.

सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे सचिव एस.टी.गडदे तसेच मराठी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# कार्यकर्त्यांचे ऊर्जास्थान!

अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या महाअधिवेशनात केलेले मार्गदर्शन पक्षाच्या कार्यकर्त्यांना पुन्हा एकदा रणमैदानात कार्यरत होण्यास उद्युक्त करणारे आहे आणि नेमकी हीच बाब हेरून विरोधकांच्या पोटात गोळा आला असावा. कारण भाजपकडे कार्यकर्त्यांची जशी अभेद्य फळी आहे, तशी कुठल्याच पक्षाकडे नाही, ही वस्तुस्थिती आहे. हेच कार्यकर्ते पुन्हा एकदा कामाला भिडले की त्यांच्यासमोर कोणीही टिकणार नाही याची जाणीव विरोधकांना नक्कीच झाली असेल.

**कुठलाही राजकीय पक्ष हा उत्तम नेतृत्त्व आणि जनमानसात रुजलेल्या कार्यकर्त्यांच्या अभेद्य फळीच्या जोरावरच प्रगतीची नवनवी क्षितीजे गाठत असतो. भारतीय जनता पक्ष हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. नेतृत्व आणि कार्यकर्त्यांच्या एकजिनसी कार्यासोबत आणखी एक गोष्ट पक्षासाठी आवश्यक असते, ती म्हणजे काळाबरोबर बदलणे. भाजपने कालानुरुप बदल आत्मसात केल्यानेच आज हा सुवर्णकाळ या पक्षाच्या वाट्याला आला आहे. पुण्यात बालेवाडी येथे झालेल्या पक्षाच्या महाअधिवेशनात रविवारी हजारो कार्यकर्त्यांसमोर ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जे ओजस्वी भाषण केले, त्यामुळे पक्षात उत्साहाचे नवे भरते आले तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांचा खरपूस समाचार घेतानाच त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना उत्साहाचे असे काही इंजेक्शन दिले की पक्षात प्रचंड ऊर्जा खेळू लागल्याचा भास तेथेच झाला. नुकत्याच होऊन गेलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात अपेक्षेइतके यश मिळाले नव्हते. या अंशत: अपयशाची कारणे अनेक असतील आणि आपापल्या परीने त्याचे विश्लेषण केले जाते आहेच. महाविकास आघाडीने चालवलेल्या अपप्रचाराला यश मिळाले, कारण त्याचा योग्य तो प्रतिवाद करण्यात आपण कमी पडलो, अशी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भावना आहे. ही चूक विधानसभा निवडणुकीत नक्कीच दुरुस्त केली जाईल यात शंका नाही. पण जे घडले ते नाकारण्यात अर्थ नाही. लोकसभा निवडणुकीतील अंशत: अपयशामुळे कार्यकर्त्यांचाही हिरमोड होणे स्वाभाविक होते. निवडणुकीत हारजीत होत असतेच. पण त्यामुळे समाजासाठी झटण्याचे कार्य थांबवण्याची गरज नसते. सुदैवाने विरोधकांनी एकत्र मोट बांधूनही फारसा उपयोग झाला नाही, आणि केंद्रात पुन्हा एकदा मोदी सरकार सत्तेवर आले. महाराष्ट्रातील अपयशाचा तितकासा फटका भाजपला राष्ट्रीय पातळीवर बसला नाही, हे खरे. पण आगामी निवडणुका राज्यातीलच असणार आहेत. त्यामुळे संपूर्ण जोर लावून त्या लढाव्या लागतील. विरोधकांच्या अपप्रचाराला आक्रमकपणे ठोकून काढण्याचा सल्ला भाजपचे राज्यातील वरिष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी दिलाच, पण गृहमंत्री अमित शहा यांनीही दणक्यात जोश भरला. फडणवीस-शहा यांच्या बालेवाडीतील आक्रमक भाषणांमुळे विरोधकांच्या गोटात मात्र खळबळ माजलेली दिसते. ‘ठोकून काढा’ ही भाषा गृहमंत्र्यांच्या तोंडी शोभून दिसत नाही, अशी टिप्पणी ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केली. काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसायला लागल्यानंतर त्यांची आणि त्यांच्या पक्षाचीही भाषाच बदलली. फडणवीस यांनी फेक नॅरेटिव चालवणाऱ्या विरोधकांना जशास तसे बिनधास्त उत्तर द्या, त्यासाठी वरिष्ठांच्या आदेशाची वाट बघत बसू नका, असे आपल्या कार्यकर्त्यांना सांगितले आहे. यात ठोकशाही कुठून आली, याचे उत्तर राऊत यांनीच शोधावे. रोज बेलगाम आरोप करताना सभ्यतेचे कुठलेही संकेत आपण पाळायचे नाहीत, आणि त्याला प्रतिरोध झाला की ठोकशाहीविरुध्द आरडाओरडा करायचा, हेच ते फेक नॅरेटिव्हचे उदाहरण आहे.**

# रोहा एसटी बसस्थानकाला गळती | प्रवासी होताहेत ओलेचिंब; परिसरातही साचतेय पाणी

**रोहे : प्रतिनिधी**





कोकणातील खासगीकरणातून बांधलेले दुसरे बसस्थानक असलेल्या रोहा बसस्थानकाला गळती लागली आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने रोहा बसस्थानकाची वास्तू उभी राहिली होती, परंतु देखभाल दुरूस्तीअभावी आज या वास्तूची दुरवस्था झाल्याची दिसून येते.

रोहा हे तालुक्याचे ठिकाण आहे. त्यामुळे तालुक्यातील नागोठणे, मेढा, यशवंतखार, विरजोली, भालगाव, घोसाळे, चणेरा, कोलाड, सुतारवाडी आदी परिसरातील नागरिक तालुक्याचे ठिकाणी विविध कामासाठी एसटीने येत असतात. त्यात महिलांना अर्धे टिकीट असल्याने मोठ्या संख्येने महिला एसटीच्या प्रवासाला पसंती देत असतात. त्यामुळे नेहमीच बसस्थानक गजबजलेले असते. रोह्याच्या ग्रामीण भागासह अन्य जिल्ह्यात जाण्यासाठी या बसस्थानकात मोठ्या प्रमाणात प्रवासी येत असतात. आता पावसाळा सुरू झाला आहे. या पावसाळ्यात नेहमीच गजबजलेले असलेल्या रोहा बस स्थानकाचे छत गळताना दिसत आहे.

बसस्थानकाच्या छतावरून टपटप पाणी प्रवासांच्या अंगावर पडत आहे. त्यामुळे प्रवासी ओलेचिंब होताना दिसत आहे. तालुक्याचे महत्त्वाचे ठिकाण असलेल्या बसस्थानकाला गळती लागल्याने प्रवाशांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. बसस्थानकाच्या आवारातदेखील सर्वत्र पाणी साचल्याने प्रवाशांसह एसटी चालकांची तारांबळ उडत आहे. प्रवाशांची समस्या सोडवण्यासाठी प्रशासन लक्ष घालेल का? असा सवाल विचारला जात आहे.

## कर्जतमध्ये आढळला झाडाला लटकलेला महिलेचा मृतदेह

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतीमधील सालवड येथे झाडाला लटकलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळला आहे.



या महिलेच्या मृत्यूबद्दल संशय व्यक्त केला आत असून माहिती मिळताच पोलिसांनी घटनस्थळी जाऊन पंचनामा केला.

सालवड हद्दीतील नसरापूर दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या आतील भागात एका झाडाला अंदाजे ३५ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. चेहऱ्यावर ॲसिड अथवा केमिकल टाकून चेहरा ओळखता येणार नाही, अशा अवस्थेतील मृतदेह एका ग्रामस्थाच्या निदर्शनास आल्याने स्थानिक पोलीस पाटलांनी कर्जत पोलीस ठाण्यात याबाबत माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली आहे. शवविच्छेदननंतर अधिक माहिती समोर येईल, मात्र याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

## फोनवर बोलताना छतावरून पडून तरुणाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

आपल्या नातेवाईकांशी मोबाईलवरून बोलण्यासाठी बिल्डींगचे टेरेसवर गेलेल्या ३२ वर्षीय तरुणाचा तोल पडल्याने मृत्यू झाला.

तालुक्यातील विळे वरचीवाडी येथे सिद्धीविनायक बिल्डींगमध्ये राकेश भक्तीपदा संत्रा (मुळ रा. मधुबन, कोतुलपुर, जि. बनकुरा, रा. पश्चिम बंगाल) हा राहत होता. शनिवारी (दि.२०) रात्री ९.३० वा.च्या सुमारास नातेवाईकांशी बोलण्यासाठी टेरेसवर गेला आणि बोलत असताना त्याचा तोल जाऊन तो खाली पडला. त्यास उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. माणगाव पोलीस ठाण्यात या घटनेची आकस्मित मृत्यूची म्हणून नोंद करण्यात आली आहे.

## आंबोट गावाला जोडणाऱ्या रस्त्याची झाली नदी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील टाटा कॅम्प परिसरातील भालिवडीपासून आंबोटपर्यंत जाणारा रस्ता खड्डेमय झाला असून रस्त्याला नदीचे स्वरूप आले आहे.

भालिवडी गावातून निघणारा रस्ता आंबोट गावात जातो. या रस्त्याची अवस्था ग्रामस्थांनी समाज माध्यमांवर व्हायरल केली असून त्या रस्त्यावरून होडीने प्रवाय करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. त्याचप्रमाणे रस्त्यावर खड्डेही पडले आहेत. त्यामुळे या रस्त्याच्या दुरूस्तीची मागणी ग्रामस्थ करीत आहेत. भालिवडी गावातून आंबोट आणि पुढे पाली गावाकडे जाणारा रस्ता काही वर्षांपूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून तयार करण्यात आला होता, मात्र महिनाभरातील



पावसाळ्यात या रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. रस्त्यात मोठमोठे खड्डे पडले असून त्या खड्ड्यात पाणी साचल्याने होडीने प्रवास करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. त्यामुळे या रस्त्याची लवकरात लवकर दुरूस्ती करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# पेणमध्ये अक्षता म्हात्रे हत्येच्या निषेधार्थ नारीशक्तीचा मोर्चा

**पेण : प्रतिनिधी**

अक्षता म्हात्रे हिच्या निर्घृण हत्येचा व तिच्यावर झालेल्या अत्याचाराविरोधात पेण शहरातील गांधी मंदिर ते पोलीस ठाणे असा निषेध मोर्चा नारीशक्ती मंचाच्या वतीने काढण्यात आला होता.

या वेळी शिवप्रेमी संघटना, सह्याद्री प्रतिष्ठान, हिंदुस्तान संघटना, नागरिक हे



भर पावसात मोर्चात सहभागी झाले होते. नारीशक्ती मंच्याच्या तसेच सहभागी संघटनेच्या वतीने आरोपींना जलद गतीने फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीचे निवेदन पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांना देण्यात आले. महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी घाडगे, पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे हे उपस्थित होते.

मोर्चात नारीशक्तीच्या मोहिनी गोरे, माजी नगरसेविका वसुधा पाटील, मुस्कान झटाम, भाजपचे बंडू खंडागळे, राजेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते राजन झेमसे, सी.आर. म्हात्रे, युवा सेनेचे तालुकाप्रमुख योगेश पाटील, रोशन टेमघरे यांच्यासह विविध सामाजिक संघटना व विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महिला व तरुण सहभागी झाले.

## भाजपचा ‘किरण’ सर्वसामान्यांसाठी आशादायी

### हेल्पलाईनच्या माध्यमातून समस्यांचे निरसन

**नेरळ : प्रतिनिधी**

भाजपचे कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांनी लॉन्च केलेले मोबाईल हेल्पलाईन नंबर हा सर्वसामान्यांसाठी आशेचा ’किरण’ ठरत आहे. तालुक्यातील



सर्वसामान्य नागरिक आता आपल्या समस्या सोडवण्यासाठी या हेल्पलाईन नंबरचा सर्रास वापर करीत असून आजवर न सुटलेल्या समस्या सुटत आहेत. नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील दोन वर्षांपासूनचे रस्त्यावरील खड्डे या हेल्पलाईनवर आलेल्या तक्रारीनंतर भरण्यात आले आहे.

किरण ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी परिवर्तन हेल्पलाईन ॲप या माध्यमातून (९११९४४९०९९) हेल्पलाईन मोबाईल नंबर लॉन्च केला होता. आता याच हेल्पलाईन नंबरच्या माध्यमातून सर्वसामान्य जनता आपल्या दैनंदिन समस्या सोडवत आहेत, तर शासनाच्या योजनेचा लाभ घेताना दिसत असल्याचे चित्र समोर आले. गेली दोन वर्षे रस्त्यावर पडलेला खड्डा नेरळ ग्रामपंचायतीकडे तक्रार देऊनही भरला जात नव्हता. तोच या हेल्पलाईन वरून आलेल्या तक्रारीनंतर भरण्यात आला.

नेरळ जकात नाका ते मुख्य बाजारपेठ अंबिका नाका या रस्त्यावरील पडलेले खड्डे भरण्यात आले. याच हेटकर आळी परिसरातील नागरिकांनी आता भाजपच्या हेल्पलाईन मोबाईलवर फोन फिरवला असता, हे खड्डे भरण्यात आले आहे. आजवर तालुक्यातील या हेल्पलाईनच्या माध्यमाद्वारे शेकडो समस्या सुटलेल्या आहेत, नागरिक या हेल्पलाईनचा वापर करताना दिसत आहेत.



## पौधजवळ गॅसवाहक टँकर उलटला

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

**वायूगळतीने परिसरात काही काळ घबराट**

सावरोली-खारपाडा मार्गावर पौध गावाजवळ केमिकल गॅसटँकर सोमवारी (दि.२२) सकाळी ११ वा. सुमारास उलटला. टँकर उलटल्याने सिलिंडरमधून गॅसगळती झाली. या प्रकाराने गावात काही काळ घबराट निर्माण झाली होती.

घटनास्थळी केमिकल एक्सपर्ट धनंजय गीत, खोपोली अग्निशमन दलाचे जवान, खालापूर तहसील कार्यालयाचे कर्मचारी व यंत्रणा तातडीने दाखल होत सिलिंडरचे बटण बंद करून गळती थांबविण्यात यश मिळविले. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अल्काईल अमाईन्स या कंपनीतील एक्सपर्टदेखील त्या ठिकाणी मदत करण्यासाठी पोहचत गॅसगळती थांबवली.

# नागरी हिताच्या दृष्टिकोनातून कामे सुरु -संतोष पोटफोडे

**रोहे : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे नागरिकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून काम करीत असतात. ते प्रगल्भ नेते आहेत. विद्यार्थ्यांचे शिक्षण, आरोग्यासाठी काम करीत असून मुलांपासून वयोवृद्धांची काळजी घेत असतात, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी केले.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा अष्टमी नगर परिषद शाळेतील मुलांच्या आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे बोलत होते. या वेळी राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, स्नेहा आंब्रे, उमेश लोखंडे, मयुर पायगुडे, मजीद पठाण, मयुर पायगुडे, विनीत वाकडे, रवी चाळके, मुख्याध्यापिका विद्या धनवी, चंद्रकांत पार्टे, डॉ तन्वी पंदारे, डॉ. अभय ससाणे, नुरी रोहावाला, डॉ. रत्नदिप गवळी, डॉ. वृषाली गीरीगोसावी, राजेश, डॉ. रीचा, डॉ. शुभम म्हात्रे, डॉ. सारा डोंगरकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, समाधान शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन विद्या घोंडीदे यांनी केले.

## सततच्या पावसामुळे चौकमध्ये जनजीवन विस्कळीत

**चौक : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीपासून सुरू झालेला पाऊस थांबण्यास तयार नाही. त्यामुळे चौक परिसरात जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे.

सहा दिवस सतत पावसाचे थैमान सुरू आहे. खालापूर तालुक्यातील खासगी शाळांना दुपारच्या सत्रात सुट्टी जाहीर करण्यात आली. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. या तुफान पावसामुळे रस्त्यांची दूरवस्था झाली आहे. तालुक्यातील काही रस्त्यांची चाळण झाली आहे, अनेक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. यातून वाहनचालक हैराण झाले आहेत.

## पोलादपूरमध्ये पाककला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ १३७ महिलांचा सहभाग; रसिका घाडगे ठरल्या विजेत्या



**पोलादपूर : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पाककला स्पर्धेचे आयोजन विक्रमराव मोरे सभागृह येथे करण्यात आले. या वेळी १३७ अन्नपूर्णांनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

स्पर्धेतील सहभागी महिलांनी विविध प्रकारचे पदार्थ बनवून आपली कला सादर केली. या वेळी प्रथम क्रमांकाचा रेफ्रिजरेटर रसिका घाडगे, द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मायक्रोवेव्ह ओव्हन सारिका गोळे, तर लक्ष्मी सकपाळ यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिक्सर पटकावला. उत्तेजनार्थ बक्षीस डिनर सेटसुमन महाडिक आणि आरती कासार यांनी मिळवला.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादीचे नेते बाबुशेठ खानविलकर, महिला प्रदेश सरचिटणीस अपेक्षा कारेकर, नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, नगरसेविका तथा महिला व बालकल्याण सभापती अस्मिता पवार, नगरसेविका शिल्पा दरेकर, भाजप महिला शहराध्यक्ष उज्ज्वला शेठ, कांचन बुटाला, सुप्रिया बुटाला, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विठोबा पार्टे, शहराध्यक्ष अजित खेडेकर, नितीन मधुकर शेठ, माजी सरपंच संभाजी जाधव, रोहा तालुका अध्यक्ष प्रीतम पाटील, परीक्षक स्वरांजली शिर्के, सारिका दळवी, ना. आदिती तटकरे यांचे स्वीय सचिव अनिकेत पवार आदी उपस्थित होते.




**खोपोली : सुभाषनगर येथील जेसीएम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी गुरु द्रोणाचार्य व अर्जुन अशी वेशभूषा करून गुरुंचे पाद्यपूजन केले. गुरु-शिष्यावर आधारित गीताचे सादरीकरणही या ठिकाणी करण्यात आले.**

## चौल नाक्यावर तुडूंब पाणी

■ वाहनचालक, पादचाऱ्यांचे अतोनात हाल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल नाक्यावरील रस्त्याची दूरवस्था असून ऐन पावसाळ्यात चौल नाक्यावर पाणी साचले आहे. त्यामुळे येथून वाहनांना तारेवरची कसरत करावी लागत असून विशेषतः पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप चौल राष्ट्रवादीचे कार्यकर्ते प्रवीण राऊत यांनी केला आहे.

ऐतिहासिक गाव अशी महती असलेल्या चौल गावाच्या नाक्यावर मुसळधार पावसामुळे पाणी साचले आहे. येथून मार्गस्थ होत असलेल्या वाहनांना पाण्यात खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने चालकांची तारांबळ उडते. पावसाळ्यातील पाण्याचे वाहून जाण्यास योग्य नियोजन नसल्याने व रस्त्याची दुरवस्था यामुळे नागरिकांना त्रास सहन



करावा लागत आहे.

पाणी वाहून जाण्यासाठी येथील नाले बुजविल्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी साचून तळी निर्माण झाली आहे. शिवाय चौल नाक्यावरील पेव्हरब्लॉक निसटून गेले आहेत. अलिबाग -मुरूड रस्ता दुरूस्ती करताना सार्वजनिक बांधकाम खात्याने चौल नाक्यावरील नादूरूस्त रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप प्रवीण राऊत यांनी केला. त्यामुळे आता तरी नागरिकांचा त्रास लक्षात घेऊन या रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे.

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-28042024-253909
CG-DL-E-28042024-253909

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 1714] नई दिल्ली, शुक्रवार, अप्रैल 26, 2024/वैशाख 6, 1946
No. 1714] NEW DELHI, FRIDAY, APRIL 26, 2024/VAISAKHA 6, 1946

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

### अधिसूचना

नई दिल्ली, 26 अप्रैल, 2024

**का.आ. 1806(अ).**—केन्द्रीय सरकार ने, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उपधारा (1) के अधीन जारी की गई भारत सरकार के सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय की अधिसूचना संख्या का.आ. **S.O. 4715(E). तारीख 27/10/2023**, जो भारत के राजपत्र, असाधारण, भाग II, खण्ड 3, उपखंड (ii) में प्रकाशित की गई थी, द्वारा महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH54A के कि.मी. 0 से कि.मी.27.2 (सब डिविशनल अफसर माणगाव , कचेरी रॊड , Tal. मांगों Dist. रायगढ़) तक के भूखण्ड पर टोल प्लाजा के निर्माण, अनुरक्षण, प्रबंधन और प्रचालन के लिए उस अधिसूचना से उपाबद्ध अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा की थी ;

और उक्त अधिसूचना का सार उक्त अधिनियम की धारा 3क की उपधारा (3) के अधीन तारीख **"17/01/2024 "** को **"रत्नागिरी टाइम्स "** और **"आपले साम्राज्य पोलादपूर "** दोनों में प्रकाशित किया गया था ;

जबकि सक्षम प्राधिकारी को धारा 3-ग के तहत दायर आपत्ति प्राप्त हुई है, जिस पर विचार किया गया है और उसका उचित रूप से निपटान किया गया;

और सक्षम प्राधिकारी ने उक्त अधिनियम की धारा 3घ की उपधारा (1) के अनुसरण में, केन्द्रीय सरकार को अपनी रिपोर्ट दे दी है ;

अतः अब, केन्द्रीय सरकार, सक्षम प्राधिकारी की उक्त रिपोर्ट प्राप्त हो जाने पर और उक्त अधिनियम की धारा 3घ की उपधारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह घोषणा करती है कि उक्त अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि का पूर्वोक्त प्रयोजन के लिए अर्जन किया जाना चाहिए ;

और अब, केन्द्रीय सरकार, उक्त अधिनियम की धारा 3घ की उपधारा (2) के अनुसरण में यह घोषणा करती है कि इस अधिसूचना के राजपत्र में प्रकाशन पर, उक्त अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि सभी विल्लंगमों से मुक्त होकर आत्यन्तिक रूप से केन्द्रीय सरकार में निहित हो जाएगी ।

### अनुसूची

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH548 A के कि.मी. 0 से कि.मी.27.2 (सब डिविशनल अफसर माणगाव, कचेरी रॊड, Tal. मांगों Dist. रायगढ़) के लिए अर्जन की जाने वाली संरचना सहित अथवा संरचना रहित विवरण।**


| राज्य का नाम: महाराष्ट्र | | | जिले का नाम: रायगड | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर में) | भूस्वामी/ हितबद्ध व्यक्तियों का नाम |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| तालुक का नाम: तळा | | | | | |
| गांव का नाम: मांदाड | | | | | |
| 1 | १४/१/६ | निजी | वेट | 0.04 | 7/12 नाही.<br>(14/1/6) |
| 2 | १४/१/८ | निजी | वेट | 0.015 | 7/12 नाही.<br>(14/1/8) |
| 3 | १४/१/९ | निजी | वेट | 0.04 | 7/12 नाही<br>(14/1/9) |
| 4 | १४/१/ब | निजी | वेट | 0.01 | जयवंती जनार्दन घाडगे इतर अधिकारात :- 32 ग बोजा वासुदेव विठ्ठल भट र.रु. 421.76/- चा बोजा.<br>(14/1/B) |
| 5 | १४/१/ड | निजी | वेट | 0.115 | जनी कानु पिठे, भिमा धर्मा मोडके, लक्ष्मीबाई हरी दांडेकर, भगवान हरी दांडेकर, मंगेश हरी दांडेकर, चंद्रकांत हरी दांडेकर, देवांगी दिगंबर माने, मानसी मनोहर टावरे, लिला नथुराम दांडेकर, नामदेव नथुराम दांडेकर, ज्योती जगन्नाथ कडू, भाविका भगवान साजेकर.<br>(14/1/D) |
| 6 | १४/१/अ | निजी | वेट | 0.035 | किशोर काशिनाथ दांडेकर, हेमंत काशिनाथ दांडेकर, हेमलता काशिनाथ दांडेकर, कविता काशिनाथ दांडेकर, विठाबाई गणपत दांडेकर, राधिका रामा करंजे, हाशिबाई गोपाळ ताम्हणकर.<br>(14/1/A) |
| 7 | १४/२ | निजी | वेट | 0.008 | नारायण धोंडू दांडेकर, मथीबाई धोंडू दांडेकर, पांडूरंग धोंडू दांडेकर, हंसाबाई हरि साजेकर, |
| | | | | | जनीबाई दामू मालुसरे.<br>(14/2) |
| 8 | १४६/० | निजी | वेट | 0.01 | महाराष्ट्र शासन.<br>(146/0) |
| 9 | १४७/३ | निजी | पड | 0.085 | बदरुन्निसा अब्दुला दांडेकर, दाऊद अब्दुला दांडेकर, इकबाल हुसैन अ. दांडेकर, रुक्साना रफीक चोगले, शहनाज अ. अलीम दांडेकर, मोहमद अजहर अ. अलीम दांडेकर, मुनिजा अ. अलिम दांडेकर, अजरा अ. अलिम दांडेकर, ऐजाज अब्दुल रशिद दांडेकर, फराज अब्दुल रशिद दांडेकर, सबिहा अहमद कलबसकर, शाजिया अब्दुल रशिद दांडेकर, नसिमा अब्दुल हाफिज दांडेकर, अब्दुला अब्दुल हाफिज दांडेकर, जुनेद अब्दुल हाफिज दांडेकर, नवेद अब्दुल हाफिज दांडेकर, उजमा आदनान कलदमे, अकबरी इस्माईल दांडेकर.<br>(147/3) |
| 10 | १४७/४/अ/१ | निजी | पड | 0.18 | शगुफ्ता अझगर नाखावाजी, अब्दुल समद शेख दाऊद दांडेकर, जुलेखा अब्दुल कादीर दांडेकर, सलीम अब्दुल कादीर दांडेकर, शादाब अब्दुल कादीर दांडेकर, साजीद अब्दुल कादीर दांडेकर, शफीया इस्माईल पटेल, शहनाज जमील पांढरे, ओमकार मच्छिंद्र मोहिते, बिजली नंदकुमार लोखंडे, इतर अधिकारात :- लक्ष्मीबाई चांग्या खंडू क्षे. 0.05.00 हे. आर. हेमंत चांग्या खंडू, रमेश चांग्या खंडू, तुळशीदास चांग्या खंडू, कविता जयवंत बळी.<br>(147/4/A/1) |
| 11 | १४७/७ | निजी | पड | 0.29 | 147/7/इ - महाराष्ट्र शासन, 147/7/क- सहदेव रामजी मानकर, विठोबा रामजी मानकर, तुषार यशवंत हुमा, 147/7/ग- शंकर विश्वनाथ भट, इतर अधिकारात - साधे कुळ- पांडूरंग नथु दांडेकर, जनार्दन नथु दांडेकर, भगवान नथू दांडेकर, शेवंती हरी पातेरे, प्रकाश केरु दांडेकर, लक्ष्मी केरु दांडेकर, 147/7/ज - कविता काशिनाथ दांडेकर, किशोर काशिनाथ दांडेकर, हेमलता काशिनाथ दांडेकर, हेमंत काशिनाथ दांडेकर, विठाबाई गणपत दांडेकर, राधिका रामा करंजे, हाशीबाई गोपाळ ताम्हणकर, 147/7/ड - शंकर विश्वनाथ भट, इतर अधिकारात - रघुनाथ धोंडू कांबळे, गजानन धोंडू कांबळे, नवनाथ धोंडू कांबळे, प्रमिला धोंडू कांबळे, दिपाली संजय कोतवाल, देविदास गणपत गाणेकर, नामदेव गणपत गाणेकर, रुपाली संजय कुंडे, विकास विठोबा कांबळे, विक्रांती प्रफुल्ल गाणेकर, विजया विठोबा कांबळे, विवेक विठोबा कांबळे,147/7/फ - शंकर विश्वनाथ भट, मिरा वासुदेव मेहंदळे, इतर अधिकारात - साधे कुळ -जनार्दन महादेव साजेकर, हरी महादेव साजेकर, आनंदी लक्ष्मण साजेकर, केशव लक्ष्मण साजेकर, दामू लक्ष्मण साजेकर, कविता काशिनाथ देवकर, पार्वती भिवा साजेकर, भगवान भिवा साजेकर, लक्ष्मी रामचंद्र साजेकर, स्नेहा यशवंत साधू, 147/7/ब- शंकर विश्वनाथ भट, मिरा वासुदेव मेहंदळे, इतर अधिकारात - देवजी पांग्या साजेकर, भागीर्थी देवजी कालप, द्रौपदी तुकाराम साजेकर, शेवंती रामचंद्र पिठे, सुवर्णा सखाराम तलार, राजश्री रामचंद्र मालुसरे, कामिनी किसन तांदळेकर, 147/7/ह- शंकर विश्वनाथ भट, मिरा वासुदेव मेहंदळे, इतर अधिकारात - साधे कुळ- जनी कानू पिठे, नथु जानू दांडेकर, भिमा धर्मा मोडके, चंद्रकांत हरि दांडेकर, देवांगी दिगंबर माने, भगवान हरि दांडेकर, मानसी मनोहर टावरे, मंगेश हरि दांडेकर, लक्ष्मीबाई हरि दांडेकर.<br>(147/7/E, 147/7/K, 147/7/G, 147/7/J, 147/7/D, 147/7/7F, 147/7/B, 147/7/H) |
| 12 | १४७/७/अ | निजी | पड | 0.11 | ओमकार मच्छिंद्र मोहिते, बिजली नंदकुमार लोखंडे.<br>(147/7/A) |
| 13 | १४७/८ | निजी | पड | 0.085 | मथीबाई धोंडू दांडेकर, पांडूरंग धोंडू दांडेकर, हंसाबाई हरि साजेकर, जनीबाई दामू मालुसरे, नारायण धोंडू दांडेकर.<br>(147/8) |
| 14 | १४९/१ | निजी | पड | 0.085 | अब्दुल अजिज इस्माईल सिध्दीकी<br>(149/1) |
| 15 | १५ | निजी | वेट | 0.01 | द्रौपदी दामोदर मालुसरे, पांडूरंग महादू मालुसरे, सहादेव महादू मालुसरे, बाळाजी महादु मालुसरे, भगवान दामोदर मालुसरे, प्रमिला दामोदर मालुसरे, चंद्रकांत दामोदर मालुसरे, लक्ष्मीबाई सहादेव साजेकर, शांता महादेव मोरे, नर्मदा भिकु कदम, पार्वती लक्ष्मण मालुसरे, नवनाथ लक्ष्मण मालुसरे, निकीता लक्ष्मण भात्रे, दामिनी दत्तात्रेय तांदळेकर, हर्षदा हरिश्चंद्र महाडीक, इतर अधिकारात :- वासुदेव विठ्ठल भट यांचा 32ग चा बोजा र.रु.<br>223.55/- ह 3<br>(15) |
| 16 | २०२/० | निजी | वेट | 0.045 | 7/12 नाही.<br>(202/0) |
| 17 | २०३/२ | निजी | वेट | 0.04 | हेमंत काशिनाथ दांडेकर, हेमलता काशिनाथ दांडेकर, किशोर काशिनाथ दांडेकर, कविता काशिनाथ दांडेकर, विठाबाई गणपत दांडेकर, राधिका रामा करंजे, हाशीबाई गोपाळ ताम्हणकर.<br>(203/2) |
| 18 | २४२/० | निजी | वेट | 0.015 | (242/1) - जयवंती जनार्दन घाडगे, इतर अधिकारात :- वासुदेव विठ्ठल भट यांचा र.रु. 421.76 चा बोजा ह.4 (242/2) - लक्ष्मीबाई दगडू साजेकर, देवकी भागोजी मोरे, वेणू दामू शेडगे, पार्वती मालू भोकटे, उषा कृष्णा दांडेकर, अनिता लक्ष्मण दांडेकर, रेखा लक्ष्मण दांडेकर, प्रमोद लक्ष्मण दांडेकर, उमेश लक्ष्मण दांडेकर.<br>(242/1, 242/2) |
| 19 | २४४ | निजी | पड | 0.04 | जयवंती जनार्दन घाडगे इतर अधिकारात :- 32 ग बोजा वासुदेव विठ्ठल भट र.रु. 421.76/- चा बोजा<br>(244) |
| 20 | २४६ | निजी | वेट | 0.065 | पदुबाई दगडु हरबा, नारायण दगडु हरबा, कृष्णा दगडु हरबा, जना दगडु हरबा, हिराबाई केशव हरबा, सुरज केशव हरबा. इतर अधिकारात :- 319.99/- चा बोजा ह.4 यशवंत आबाजी भट यांचा र. रु.<br>(246) |

पान ७ वर

# नवी मुंबईतील अनधिकृत शाळांवर कारवाई

## महापालिका क्षेत्रातून १५ कोटी ५४ लाख दंड वसूल



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या क्षेत्रातील चार अनधिकृत शाळांना १५ कोटी ५४ लाख १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे, अशी माहिती नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षणाधिकारी अरूणा यादव यांनी दिली.

या अनधिकृत शाळा बंद होत नाही. त्यामुळे त्यांच्या संचालकांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्यासाठी पोलीस ठाण्यात तक्रार करावी, असे आदेश महापालिकेचे तत्कालीन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिले होते. त्यानंतर सध्याचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनीही या विषयी शिक्षणाधिकारी अरूणा यादव यांना निर्देश दिले होते. त्यानुसार अल मोमीन स्कूल, इकरा ईस्लामिक स्कुल अॅण्ड मक्तब, ऑर्किडस् द इंटरनॅशनल स्कूल या शाळांच्या संचालकांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात यावा, याविषयीची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यांना करण्यात आली आहे.

या तक्रारीवरून तपास अधिकारी गुन्हा नोंदणी करण्याची प्रक्रिया करत असल्याची माहिती संबंधित पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी दिली आहे. तसेच अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी प्रवेश घेऊ नये याकरिता महापालिका शिक्षण विभागाच्या माध्यमातून संबंधित शाळांच्या दर्शनी भागामध्ये सूचनाफलक देखील लावण्यात आले आहे.

महापालिकेच्या क्षेत्रात वर्ष २००० पासून अद्यापपर्यंत सुमारे ३५ अनधिकृत शाळा होत्या. या अनधिकृत शाळांना शिक्षण विभागाकडून शाळा बंद करण्याच्या वारंवार नोटीसा बजावल्या होत्या. या नोटिसांना दाद न दिल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याच्याही नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यामध्ये एका शाळेने तीन लाख १० हजार रुपये दंड भरला आहे. तर वारंवार नोटीसा पाठवल्यामुळे ३५ पैकी काही शाळा बंद झाल्या, तर काही शाळांना शासनाकडून मान्यता मिळाली आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिकेच्या सीबीएससी शाळेत विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन आणि लॉटरी पद्धतीने पूर्ण करण्यात आली, अशी माहिती शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी दिली.

पालकांनी नर्सरीपासून ते सातवी पर्यंतच्या प्रवेशासाठी महापालिकेकडे अर्ज केले होते. तीनही शाळांमध्ये पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी दीडशेहून अधिक जागा होत्या. यामध्ये सर्वाधिक अर्ज हे नर्सरीच्या वर्गांसाठी आले होते. तसेच पहिली ते सातवी पर्यंत असलेल्या वर्गात जागा शिल्लक असलेल्या जागीही ऑनलाईन आणि लॉटरी पद्धतीने प्रवेश देण्यात आले आहेत. त्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले आहे, अशी माहिती अरुणा यादव यांनी दिली.

# चिरनेरमध्ये जंगली वानरांचा धुमाकूळ

## अन्नाच्या शोधात मानवी वस्तीत वावर



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर या इतिहास प्रसिद्ध गावात जंगली वानरांनी घरांच्या छपरांवर उड्या मारून उच्छाद मांडला असून, ही जंगली वानरे गेल्या सात ते आठ दिवसांपासून गावात घुसली आहेत. दरम्यान, कळपाने धुडगूस घालणारी ही सात-आठ वानरे आहेत. गावात धुडगूस घालून घरांच्या छपरांचे नुकसान करणाऱ्या या वानरांचा वनविभागाने वेळीच बंदोबस्त करावा, अशी मागणी चिरनेर ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे. घरांच्या छपरांवर उड्या मारून ही वानरे घरांचे नुकसान करत आहेत.

शिवाय पावसापासून घराचे संरक्षण व्हावे यासाठी वापरण्यात आलेली ताडपत्रीही फाडून टाकत असल्यामुळे घरांना गळतीदेखील लागली आहे. त्याचबरोबर घराच्या आवारातील फळ झाडांवरील नारळ, पेरू, चिकू, सिताफळ तसेच इतर फळे ही वानरे खाऊन फस्त करत आहेत. तर उरल्या सुरल्या फळांची नासाडीदेखील करत आहेत. आधीच पावसाचे दिवस आणि त्यात घरांची कौले किंवा पत्रे फुटले तर नागरिकांना पावसाच्या पाण्याचा सामना करावा लागणार आहेच, पण तातडीने उपाय करून त्याची दुरुस्तीही करावीच लागणार आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होणार आहे.

उरण तालुक्यातील ग्रामीण भागाचा झपाट्याने विकास होत आहे, मात्र हा विकास नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास करीत आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी डोंगर पोखरून मातीचे उत्खनन झाले आहे. याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. उरण तालुक्यात वनसंपदे बरोबरच डोंगरांनी व्यापलेला परिसर मोठा आहे. विकासाच्या नावे अनेक मोठमोठे प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या ठिकाणी सर्रास मातीचे उत्खनन सुरू असते.

नवनवीन प्रकल्प या भागात राबविले जात आहेत. त्यामुळे डोंगर, जंगले उद्ध्वस्त होत आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान करणे हा दंडनीय अपराध असला तरी महसूल विभागाकडून कारवाई होत नसल्याने दिवसेंदिवस माती उत्खनाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांचे जीवन धोक्यात आले असून, त्यांचा अधिवास नष्ट होत चालला आहे. त्यामुळे त्यांना अन्नासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे या वानरांनी आपला मोर्चा मानवी वस्तीकडे वळविला आहे, मात्र याचा त्रास आता गावकऱ्यांना सहन करावा लागत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने सोमवारी (दि. २२) गुरूपौर्णिमा साजरी करण्यात केली. आषाढातील शुक्ल पक्ष पौर्णिमेला गुरूपौर्णिमा साजरी केली जाते या दिवशी गुरूंची पूजा करून त्यांना मानवंदना दिली जाते.

या दिवसाचे औचित्य साधून या पवित्र दिवशी महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी गुरुप्रती म्हणजे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या प्रति मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली ते नेहमी मार्गदर्शक व प्रेरनेचा स्त्रोत असतील असेही प्रा. राहुल कांबळे यांनी त्यांच्या मनोगतात उल्लेख केला. या वेळी महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनींनी एकमेकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिझवान मोमीन यांनी केले तसेच समितीतील सर्व सदस्यांनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहून सहकार्य केले.

# विद्यार्थ्यांमध्ये सुधारित कायद्याबाबत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ पोलीस ठाणे, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय व अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूल नेरूळच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील मुलांना व विभागातील नागरिकांना सुधारित कायदा जनजागृती व वाहतूक नियम व्यसनमुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात आले.



या कार्यक्रमात उपस्थित मार्गदर्शक वरिष्ठ पोलीस अधिकारी ब्रह्मानंद नाईकवाडी, मोटार वाहन निरीक्षक संजय चव्हाण, देविदास कंठाळे, शशांक रावळे, संगीता आमले तसेच आयोजक दिलीप आमले उपस्थित होते. नाईकवाडी व चव्हाण यांनी शाळेतील मुलांना रस्ता सुरक्षा, गुन्हेगारा बाबतीत तसेच नवीन कायद्यांबाबत बाबतीत माहिती दिली. गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीसे व वह्या पुस्तके देऊन अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूलच्या वतीने बक्षीसे व वह्या, पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला.



**डोंबिवली : नामांकित अशा स्वामींचा संगीत दरबार या संगीत समारोहात विदुषी शुभदा पराडकर व उस्ताद अस्लम खाँसाहेब यांचे शिष्य रायगडभूषण पं.उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांचे सुमधूर शास्त्रीय गायन झाले. त्यांना तबल्यावर विनायक नाईक, तर संवादिनीवर मंदार दिक्षित यांनी साथसंगत केली. या वेळी त्यांच्या गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.**

# हनुमान कोळीवाडा येथे जागतिक कांदळवन दिन



**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कस युनियन,पारंपारिक मच्छीमार बचाव सामाजिक कृती समिती व कांदळवन विभाग महाराष्ट्र राज्य, रोटरी क्लब ऑफ कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कांदळवन दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि.२१) उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा या गावातील श्री हनुमान मंदिर येथे जागतिक कांदळवन दिन साजरा करण्यात आला.

या वेळी महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर्स युनियनचे अध्यक्ष नंदकुमार पवार, ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष सुरेश कोळी, वन परिक्षेत्र उरणचे अधिकारी एन.जी. कोकरे तसेच इतर मान्यवरांनी कांदळवनाचे महत्त्व तसेच जागतिक कांदळवन दिन का साजरा केला जातो याची सविस्तर माहिती दिली.

नागरिकांच्या विविध शंका, समस्यांचे समाधान करण्यात आले. या वेळी शासनाच्या विविध उपक्रम, प्रकल्प याविषयी ग्रामस्थांना नागरिकांना माहिती देण्यात आली. मंदिरात कांदळवनशी संबंधित निसर्गाचे संवर्धन संरक्षण करणारे निसर्ग चित्राचे सुंदर अशा रांगोळी रेखाटण्यात आली. सर्व मान्यवरांनी रांगोळीचे कौतुक केले. त्यानंतर उपस्थित सर्वच ग्रामस्थ, उपस्थितांनी हनुमान कोळीवाडा गावाला लागून असलेल्या खाडीच्या किनाऱ्यावर कांदळवन परिसरात साफसफाई केली. या उपक्रमात हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचाही उत्तम प्रतिसाद लाभला होता.

या वेळी उरणचे वन परिक्षेत्र अधिकारी एन.जी. कोकरे, महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडीशनल फिश वर्कर्स युनियनचे अध्यक्ष नंदकुमार पवार, पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समितीचे अध्यक्ष रमेश भास्कर कोळी, ग्राम सुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडाचे अध्यक्ष सुरेश दामोदर कोळी, वनपाल सुनील महाडिक, रोटरी क्लब कळंबोलीचे अध्यक्ष महेश राजपूत, सचिव भरत शिंदे, माजी अध्यक्ष साधना भगत, प्रसाद पाटील, ज्येष्ठ रोटरीयन सय्याजी साळुंके, रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्पनीचे सौरभ सोमाणी, गंगाधर चिटकरे, आशा वाले, माजी सरपंच परमानंद कोळी, मंगेश कोळी, डोमनिक कोळी, तुकाराम कोळी, कृष्णा कोळी आदी उपस्थित होते.

# देवेशचंद्र ठाकूर यांचा सत्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री विजय नाहटा फाऊंडेशनतर्फे जुईनगर येथे बिहार विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा बिहार येथील सितामदी लोकसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित खासदार देवेशचंद्र ठाकूर आणि पर्यावरण समाघात प्राधिकरण महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा याचा जाहीर सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला मुरारी ठाकुर, मुनिन्द्र झा, प्रल्हाद म्हाशेठा, उत्तर भारतीय सेना जिल्हा संघटक कमलेश वर्मा,सम्पर्क संघटक प्रहलाद महासेठ, उपजिल्हा संघटक रामभरोस शर्मा, विशाल जायसवाल, धर्मेन्द्र राजभर उपशहर संघटक रामचन्द्र शर्मा गिरधारी लाल गुप्ता, प्रमोद गुप्ता यांच्या सह तमाम हिन्दी भाषिक नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

या वेळी खासदार देवेशचंद्र ठाकुर यांनी विजय नाहटा यांच्या शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक क्रीडा, धार्मिक कामाचे कौतुक केले.

# गरजू विद्यार्थिनीस शैक्षणिक साहित्य आणि आर्थिक मदत

**उरण : बातमीदार**

सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने स्थापित झालेल्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशन, उरण-रायगडच्या तर्फे रांजणपाडा येथील वडिलांचे छत्र हरपलेल्या तेजस्वी नरेंद्र तांडेल या अकरावीत शिकत असलेल्या गरीब विद्यार्थिनीस वह्या पुस्तके सर्व शैक्षणिक साहित्य, शाळेचा गणवेश आणि शैक्षणिक फीच्या स्वरूपात आर्थिक मदत देण्याचा कार्यक्रम झाला.



धुतुम ग्रामपंचायतीचे माजी सरपंच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते की ज्यांच्या हस्ते शहीद जवानांच्या मदतीसाठी दरवर्षी पाच लाखाचा निधी दिला जातो अश्या दानशूर व्यक्तिमत्वाच्या हस्ते त्यांच्याच धुतुम येथील ऑफिस मध्ये पार पडला. या वेळी असोसिएशनच्या मदती सोबतच धनाजी ठाकूर यांच्या वतीने पाच हजारांची मदतही सदर विद्यार्थिनीस देण्यात आली.

कार्यक्रमास धनाजी ठाकूर यांच्या समवेत असोसिएशनचे अध्यक्ष नितेश पंडित, उपाध्यक्ष श्याम ठाकूर, कार्याध्यक्ष पप्पू सूर्यराव, सचिव सुनिल वर्तक, सहसचिव विद्याधर गावंड, सदस्य देव डाकी, दर्शना माळी, हेमाली म्हात्रे, जगदीश कदम, विद्यार्थिनीच्या परिवारातील विकास पाटील आदी उपस्थित होते.

# इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेलच्या अध्यक्षपदी कल्पना कोठारी



**पनवेल : वार्ताहर**

इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेलच्या अध्यक्षपदी कल्पना विलास कोठारी यांची निवड झाली आहे. पनवेलच्या तथास्तु हॉल येथे झालेल्या क्लबच्या पदग्रहण समारंभात २०२४-२५ या वर्षाकरिता ही अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

कल्पना विलास कोठारी यांच्या अध्यक्षपदाखाली झालेल्या नवीन कार्यकारणीमध्ये सेक्रेटरीपदी उलका धुरी, उपाध्यक्षपदी भूमिका परमार, खजिनदारपदी ममता राजीवन, आयसोपदी शितल वाळंजू, एडिटरपदी दिपाली आडमुठे, क्लब पत्रव्यवहारपदी अर्चना राजे तर सल्लागार समितीमध्ये सुनिता आडमुठे, साधना धारगळकर, स्नेहल वाडकर, लता शाह, विद्या चव्हाण, अंजू गांधी आणि आयपीपी शितल कांडपिळे यांची निवड करण्यात आली आहे.

या वेळी झालेल्या पदग्रहण समारंभात मावळत्या अध्यक्षा शितल कांडपिळे यांनी वर्षभर केलेल्या सहकार्याबद्दल सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. सेक्रेटरी भूमिका परमार यांनी वर्षभरात केलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. नूतन अध्यक्षा कल्पना कोठारी यांनी, नवीन वर्षात होणाऱ्या प्रकल्पांची माहिती दिली व सर्व सदस्य वर्षभरात होणाऱ्या प्रकल्पात उत्साहाने सामील होऊन सहकार्य करण्याची विनंती केली. क्लबच्या खजिनदार दिपाली आडमुठे यांनी गतवर्षीचा अहवाल वाचला. स्नेहल वाडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि उपस्थितांचे आभार मानले.

# आवरे येथील शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे कॉलेजचा प्रवेशोत्सव सुरू

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने १५ जुलै २०२४च्या शासन निर्णयाद्वारे उरण तालुक्यातील आवरे येथील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स या नावाने नवीन महाविद्यालय सुरू करण्यास अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

या महाविद्यालयाच्या प्रवेशोत्सवाचा शुभारंभ नुकताच संस्थेच्या अध्यक्षा पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. या वेळी संस्थेच्या खजिनदार प्राचार्य डॉ. सुखदा चिराटे, विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे, विश्वस्त मेघा म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनि. कॉलेजचे प्राचार्य सुभाष ठाकूर, माजी वन विभाग अधिकारी महादेव गावंड आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी वारी शिक्षणाची प्रवेशोत्सव पदवीचा या संकल्पनेवर आधारित दिंडीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जेएनपीएतर्फे सीडीआरओएमइ एज्युकेशन सोसायटीला निधी

**उरण : वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जनेपप्रा), भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे बंदर, त्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमाचा एक भाग म्हणून त्यांनी एक सामंजस्य करार केला आणि सीडीआरओएमइ एज्युकेशन सोसायटी, मुंबईला निधीचा धनादेश सुपूर्द केला.



महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या मान्यवर उपस्थितीने या कार्यक्रमाला शोभा आली. जनेपप्राचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ, आय आर एस, यांनी भारत सरकारच्या आदिवासी व्यवहार मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि जनेपप्राच्या सर्व विभाग प्रमुखरांच्या उपस्थितीत चेक सुपूर्द केला.

जनेपप्राचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ म्हणाले, आम्हाला आनंद आहे कि आम्ही या गरजा आमच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) माध्यमातून पूर्ण करू शकलो. हा प्रकल्प ईएमआरएस शाळांची तंत्रज्ञानदृष्ट्या उन्नती करेल आणि आदिवासी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण आणि शिकण्याची व्यवस्था पुरवेल. जेएनपीएच्या योगदानाने, हा प्रकल्प महाराष्ट्रातील ३८ ईएमआरएसमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरविण्यात मदत करेल.

हा प्रकल्प सीडीआरओएमई एज्युकेशन सोसायटी, कल्याणद्वारे उद्योजकता आणि ग्रामीण विकास केंद्र (ईआरडीसी) - आयआयटी रोपर यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत, संगणक प्रयोगशाळेत एकूण १००० संगणक बसवले जातील, शिक्षकांना ७६ टॅब्लेट प्रदान केले जातील आणि दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सायकोमेट्रिक चाचणी, मानसिक आरोग्य समर्थन, करिअर समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रम, तसेच शिक्षक प्रशिक्षण, महाराष्ट्रातील ३८ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमध्ये घेण्यात येणार आहे. सुमारे २००० आदिवासी विद्यार्थ्यांना या प्रकल्पाचा लाभ होणार आहे.

पान ५ वरून

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | ७३/१/अ | निजी | वेट | 0.015 | नारायण धोंडू दांडेकर, पांडूरंग धोंडू दांडेकर, हंसाबाई हरि साजेकर, जनीबाई दामू मालुसरे, इतर अधिकारात :- यशवंत आबाजी भट याचा र.रु.255.33 चा बोजा. (73/1/A) |
| 22 | ७३/१/ब | निजी | वेट | 0.085 | मारुती गोविंद गाणकर, इतर अधिकारात :- यशवंत आबाजी भट यांचा र.रु. 285.58 चा बोजा, वारस अनंत गोविंद गाणकर (73/1/B) |
| 23 | ७३/१/च/१ | निजी | वेट | 0.025 | भागोजी मन्या गाणकर, विठोबा मन्या गाणकर, कानू मन्या गाणकर, सावित्रीबाई मालू गाणेकर, गणपत मालू गाणेकर, सहादेव मालू गाणेकर, दिनेश मालू गाणेकर, सुजाता रामचंद्र गाणेकर, अभिराज |
| | | | | | रामचंद्र गाणेकर, अभिषेक रामचंद्र गाणेकर, करुणा केशव पाटील. इतर अधिकारात :- यशवंत आबाजी भट यांचा 32 ग चा र. रु. 218.58 बोजा ह दोन (73/1/Ch/1) |
| 24 | ७३/१/च/२ | निजी | वेट | 0.01 | महादू दाजी गाणकर, इतर अधिकारात :- यशवंत आबाजी भट यांचा 32 ग चा र.रु. 246.54 चा बोजा हप्ते तीन (73/1/Ch/2) |
| 25 | ७४/१ | निजी | वेट | 0.03 | सविता नारायण तांदळेकर, हाशी नारायण तांदळेकर, कुंदा नारायण तांदळेकर, लक्ष्मी विठ्ठल तांदळेकर, सरिता विठ्ठल तांदळेकर, एकनाथ विठ्ठल कडव, नमिता नथूराम मानकर, नरेश नारायण तांदळेकर, दामू विठ्ठल तांदळेकर, मंदा विठ्ठल तांदळेकर, जयवंती धोंडू तांदळेकर, सुरेश धोंडू तांदळेकर, प्रकाश धोंडू तांदळेकर, जानु सोन्या तांदळेकर, उमेश धोंडू तांदळेकर, रुक्मीणी विठ्ठल देवकर, जनी हरी दांडेकर, आनंदी महादु करंबळे, इतर अधिकारात : - यशवंत आबाजी भट याचा र. रु. 369.88/- चा बोजा ह.4 (74/1) |
| | | | | **Total** | **1.488** |

[फा. सं. 12037/30/2017-MAH-P6/3D]

अभय जैन, उप सचिव

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**

**NOTIFICATION**

New Delhi, the 26th April, 2024

**S.O. 1806(E).—** Whereas by the notification of the Government of India in the Ministry of Road Transport and Highways, **S.O. 4715(E). Dated:27/10/2023** , published in the Gazette of India, Extraordinary, Part II, Section 3, Sub-section (ii) issued under sub-section (1) of section 3A of the National Highway Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government declared its intention to acquire the land specified in the Schedule annexed to the said notification for construction of Toll Plaza Maintenance, management and operation of NH-548A in the stretch of land from Km. 0 to Km. 27.2 (Sub Divisional Officer Mangaon, Kacheri Road, Tal. Mangaon Dist. Raigad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA

And whereas the substance of the said notification has been published in **"Ratanagiri Times"** and **"Aapale Samarajjya Poldapur"** both dated **17/01/2024;** under sub-section (3) of section 3A of the said Act;

And whereas the Competent Authority has received objections filed under Section 3-C, considered and settled the same appropriately;

And whereas, in pursuance of sub-section (1) of section 3D of the said Act, the competent authority has submitted its report to the Central Government;

Now, therefore, upon receipt of the said report of the competent authority and in exercise of the powers conferred by the sub-section (1) of section 3D of the said Act, the Central Government hereby declares that the land specified in the said Schedule should be acquired for the aforesaid purpose;

And further, in pursuance of sub-section (2) of section 3D of the said Act, the Central Government hereby declares that on publication of this notification in the Official Gazette, the land specified in the said Schedule shall vest absolutely in the Central Government, free from all encumbrances.

**SCHEDULE**

**Brief description of the land to be acquired, with or without structure, falling within the NH-548A in the stretch of land from Km. 0 to Km. 27.2 (Sub Divisional Officer Mangaon, Kacheri Road, Tal. Mangaon Dist. Raigad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA**

| State: MAHARASHTRA | | | District: RAIGAD | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sl. No.** | **Survey/Plot Number** | **Type of Land** | **Nature of Land** | **Area (in Hectares)** | **Name of Land Owner/Interested Person** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **Taluk: Tala** | | | | | |
| **Village: Mandad** | | | | | |
| 1 | 14/1/6 | Private | wet | 0.04 | 7/12 Not available (14/1/6) |
| 2 | 14/1/8 | Private | wet | 0.015 | 7/12 not avaliable (14/1/8) |
| 3 | 14/1/9 | Private | wet | 0.04 | 7/12 Not avaliable (14/1/9) |
| 4 | 14/1/B | Private | wet | 0.01 | Jayvanti Janardan Ghadge Other Rights:- Boja 32 G Vasudev Vitthal Bhat Rs.421.76/- (14/1/B) |
| 5 | 14/1/D | Private | wet | 0.115 | Jani Kanu Pithe, Bhima Dharma Modke, Laxmibai Hari Dandekar, Bhagvan Hari Dandekar, Mangesh Hari Dandekar, Chandrakant Hari Dandekar, Devangi Digamber Mane, Mansi Manohar Tawre, Lila Nathuram Dandekar, Namdev Nathuram Dandekar, Jyoti Jagnnath Kadu, Bhavika Bagvan Sajekar. (14/1/D) |
| 6 | 14/1A | Private | wet | 0.035 | Kishor Kashinath Dandekar, Hemant Kashinath Dandekar, Hemlata Kashinath Dandekar, Kavita Kashinath Dandekar, Vithabai Ganpat Dandekar, Radhika Rama Karanje, Hashibai Gopal Tamhankar. (14/1/A) |
| 7 | 14/2 | Private | wet | 0.008 | Narayan Dhondu Dandekar, Mathibai Dhondu Dandekar, Pandurang Dhondu Dandekar, Hansabai Hari Sajekar, Janibai Damu Malusare. (14/2) |
| 8 | 146/0 | Private | wet | 0.01 | Maharashtra Shasan. (146/0) |
| 9 | 147/3 | Private | Dry | 0.085 | Badarunnisa Abdul Dandekar, Daud Abdulla Dandekar, Ekbad Husain A.Dandekar, Ruksana Rafik Chogle, Shahnaj A.Alim Dandekar, Mohamad Ajhar A.Alim Dandekar, Munija A.Alim Dandekar, Ajara A.Alim Dandekar, Aaijaj Abdul Rashid Dandekar, Faraj Abdul Rashid Dandekar, Sabiha Ahamad Kalabaskar, Shajiya Abdul Rashid Dandekar, Nasima Abdul Hafij Dandekar, Abdulla Abdul Hafij Dandekar, Juned Abdul Hafij Dandekar, Naved Abdul Hafij Dandekar, Ujma Aadnan Kaldame, Akbari Ismail Dandekar. (147/3) |
| 10 | 147/4/A/1 | Private | Dry | 0.18 | Shagufta Azgar Nakhavaji, Abdul Samad Shekh Daud Dandekar, Julekha Abdul Kadir Dandekar, Salim Abdul Kadir Dandekar, Shadab Abdul Kadir Dandekar, Sajid Abdul Kadir Dandekar, Shafiya Ismail Patel, Shahnaj Jamil Pandhare, Omkar Macchindra Mohite, Bijali Nandkumar Lokhande Other Rights:- Varas- Laxmibai Changya Khandu Area 0.05.00 HR., Hemant Changya Khandu, Ramesh Changya Khandu, Tulshidas Changya Khandu, Kavita Jayvant Bali. (147/4/A/1) |
| 11 | 147/7 | Private | Dry | 0.29 | 147/7/E - Government of Maharashtra, 147/7/K- Sahdev Ramaji Mankar, Vithoba Ramaji Mankar, Tushar Yashwant Huma, 147/7/G- Shankar Vishwanath Bhat, Other Rights - Sade Kul- Pandurang Nathu Dandekar, Janardan Nathu Dandekar, Bhagwan Nathu Dandekar, Shevanti Hari Patere, Prakash Keru Dandekar, Laxumi Keru Dandekar, 147/7/J - Kavita Kashinath Dandekar, Kishor Kashinath Dandekar, Hemlata Kashinath Dandekar, Hemant Kashinath Dandekar, Vitthabai Ganpat Dandekar, Radhika Rama Karanje, Hashibai Gopal Tamhankar, 147/7/D - Shankar Vishwanath Bhat, Other rights - Raghunath Dhondu Kamble, Gajanan Dhondu Kamble, Navnath Dhondu Kamble, Pramila Dhondu Kamble, Deepali Sanjay Kotwal, Devidas Ganpat Ganekar, Namdev Ganpat Ganekar, Rupali Sanjay Kunde, Vikas Vithoba Kamble, Vikranti Praful Ganekar, Vijaya Vithoba Kamble, Vivek Vithoba Kamble, 147/7/F - Shankar Vishwanath Bhat, Mira Vasudev Mehandle, Other Rights - Sade Kul - Janardan Mahadev Sajekar, Hari Mahadev Sajekar, Anandi Laxman Sajekar, Keshav Laxman Sajekar, Damu Laxman Sajekar, Kavita Kashinath Devkar, Parvati Bhiva Sajekar, Bhagwan Bhiva Sajekar, Laxmi Ramchandra Sajekar, Sneha Yashwant Sadhu, 147/7/B- Shankar Vishwanath Bhat, Mira Vasudev Mehandle, Other Rights - Devji Pangya Sajekar, Bhagirthi Devji Kalp, Draupadi Tukaram Sajekar, Shevanti Ramchandra Pithe, Suvarna Sakharam Talar, Rajshree Ramchandra Malusare, Kamini Kisan Tandalekar, 147/7/H- Shankar Vishwanath Bhat, Mira Vasudev Mehandle, Other Rights - Sade Kul - Jani Kanu Pithe, Nathu Janu Dandekar, Bhima Dharma Modake, Chandrakant Hari Dandekar, Devangi Digambar Mane, Bhagwan Hari Dandekar, Mansi Manohar Taware, Mangesh Hari Dandekar, Laxmibai Hari Dandekar. (147/7/E, 147/7/K, 147/7/G, 147/7/J, 147/7/D, 147/7/7F, 147/7/B, 147/7/H) |
| 12 | 147/7/A | Private | Dry | 0.11 | Omkar Macchindra Mohite, Bijali Nandkumar Lokhande (147/7/A) |
| 13 | 147/8 | Private | Dry | 0.085 | Mathibai Dhondu Dandekar, Pandurang Dhondu Dandekar, Hansabai Hari Sajekar, Janibai Damu Malusare, Narayan Dhondu Dandekar (147/8) |
| 14 | 149/1 | Private | Dry | 0.085 | Abdul Ajij Ismail Siddiki (149/1) |
| 15 | 15 | Private | wet | 0.01 | Draupadi Damodar Malusare, Pandurang Mahadu Malusare, Sahadev Mahadu Malusare, Balaji Mahadu Malusare, Bhagvan Damodar Malusare, Pramila Damodar Malusare, Chandrakant Damodar Malusare, Laxumibai Sahadev Sajekar, Shanta Mahadev More, Narmada Bhiku Kadam, Parvati Laxuman Malusare, Navnath Laxuman Malusare, Nikita Laxman Bhatre, Damini Dattatrey Tandalekar, Harshada Harishchandra Mahadik Other Rights:- Boja 32 G Vasudev Vitthal Bhat Rs. 223.55/- (15) |
| 16 | 202/0 | Private | wet | 0.045 | 7/12 not avaliable (202/0) |
| 17 | 203/2 | Private | wet | 0.04 | Hemant Kashinath Dandekar, Hemalata Kashinath Dandekar, Kishor Kashinath Dandekar, Kavita Kashinath Dandekar, Vithabai Ganpat Dandekar, Radhika Rama Karnje, Hashibai Gopal Tamhankar (203/2) |
| 18 | 242/0 | Private | wet | 0.015 | (242/1) -Jayvanti Janardan Ghadge Other Rights:- Boja 32 G Vasudev Vitthal Bhat Rs.421.76/- (242/2)- Laxumibai Dagdu Sajekar, Devaki Bhagoji More, Venu Damu Shedge, Parvti Malu Bhokte, Usha Krushna Dandekar, Anita Lauxman Dandekar, Rekha Laxman Dandekar, Pramod Laxman Dandekar, Umesh Laxuman Dandekar Other Rights:- Boja 32 G Vasudev Vitthal Bhat Rs.170.64/- (242/1, 242/2) |
| 19 | 244 | Private | Dry | 0.04 | Jayvanti Janardan Ghadge Other Rights:- Boja 32 G Vasudev Vitthal Bhat Rs.421.76/- (244) |

पान ८ वर

# ...म्हणून हार्दिकऐवजी सूर्यकुमार कर्णधार!

## निवड समिती अध्यक्ष आगरकरांनी सांगितले कारण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सोमवारी (दि. २२) श्रीलंकेला रवाना होणार झाला. याआधी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत आगरकर यांनी हार्दिक पांड्याऐवजी सूर्यकुमार यादवला भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार का बनवले यावर प्रतिक्रिया दिली. त्याचबरोबर हार्दिकला कर्णधारपदापासून दूर का केले याबाबत माहिती दिली.



निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर म्हणाले, हार्दिक पांड्या अजूनही आमच्यासाठी महत्त्वाच्या खेळाडूंपैकी एक आहे, मात्र त्याच्यासाठी फिटनेस खरोखरच आव्हानात्मक आहे. अशा स्थितीत प्रशिक्षक, निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाला ते थोडे अवघड जाते. पुढील टी-२० विश्वचषकापूर्वी आमच्याकडे बराच वेळ आहे. अशा परिस्थितीत आम्हाला काही गोष्टी प्रयोग करून पहायच्या आहेत, कारण त्यावर सर्वकाही अवलंबून आहे.

आगरकर पुढे म्हणाले की, केएल राहुलच्या जागी हार्दिक जेव्हा कर्णधार झाला, तेव्हा मी निवड समितीचा अध्यक्ष नव्हतो. जेव्हा मी निवड समितीचा अध्यक्ष झालो, तेव्हा एकदिवसीय विश्वचषक जवळ येत होता आणि त्यानंतर लगेचच टी-२० विश्वचषक होता. हार्दिकसाठी फिटनेस ही समस्या आहे. केवळ फिटनेसच नाही, तर सूर्यामध्ये यशस्वी कर्णधार होण्याची क्षमता जास्त आहे, असे आम्हाला वाटते. दोन वर्षे म्हणजे खूप मोठा कालावधी आहे आणि या परिस्थितीत आपल्याकडे वेगवेगळे प्रयोग करून पाहण्यासाठी बराच वेळ आहे.

जे खेळाडू आमच्यासाठी नेहमीच उपलब्ध असतात त्यांना जास्तीत जास्त संधी द्यायची आहे. या भूमिकेत आम्ही हार्दिकला अधिक चांगल्या पद्धतीने सांभाळू शकतो, असे आम्हाला वाटते. त्याने टी-२० विश्वचषकात ज्या प्रकारे अष्टपैलू प्रदर्शन केले, ते सर्वांनी पाहिले. अशा परिस्थितीत त्याची कामगिरी संघासाठी महत्त्वाची आहे, न की कर्णधारपदाचा मुद्दा, असे आगरकर यांनी स्पष्ट केले.

### ऋतुराज, अभिषेकबद्दलही स्पष्टीकरण

श्रीलंकेविरूद्धच्या दौऱ्यासाठी ऋतुराज गायकवाड आणि अभिषेक शर्मा यांची निवड न करण्याबाबतही बराच वाद झाला होता. झिम्बॉब्वेविरुद्धच्या पदार्पणाच्या टी-२० मालिकेत शतक झळकावणाऱ्या अभिषेकला संधी द्यायला हवी होती. त्याचबरोबर या मालिकेत चांगली फलंदाजी करणाऱ्या ऋतुराजलाही संधी मिळायला हवी होती, असे अनेक माजी क्रिकेटपटू म्हणाले होते. याबद्दल पत्रकार परिषदेत निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर म्हणाले की, संघातून वगळलेल्या कोणत्याही खेळाडूला वाईट वाटेल, पण आमचे काम फक्त १५ खेळाडूंना निवडण्याचे आहे. रिंकूकडेच बघा, टी-२० वर्ल्डकपपूर्वी त्याने चांगली कामगिरी केली होती, पण त्याला टी-२० संघात स्थान मिळवता आले नव्हते. आम्ही फक्त १५ खेळाडू निवडू शकतो.

# खोपोलीत भव्य कुस्ती स्पर्धा रंगली

## द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त राजसिंग चिकारा यांची उपस्थिती

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



कुस्तीमहर्षी स्व. भाऊसाहेब कुंभार यांच्या स्मृती दिनानिमित्त जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे भव्य आयोजन खोपोलीत करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी भारतीय खेल प्राधिकरणाचे वरिष्ठ प्रशिक्षक तथा केंद्र शासनाचा द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त राजसिंग चिकारा यांची उपस्थिती महत्त्वाची ठरली. स्पर्धेस उत्तम प्रतिसाद लाभला.

रायगड जिल्ह्यात कुस्तीचा प्रचार, प्रसार व्हावा आणि लहान, थोर पुरुष व महिला मल्लांना प्रोत्साहन मिळावे या उदात्त हेतूने कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यासाच्या वतीने स्पर्धा घेण्यात आली.

उद्घाटन समारंभास राजसिंग चिकारा यांच्या समवेत सहाय्यक प्रशिक्षक कन्हैयालाल यादव तसेच केएटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष सुनील पाटील, न्यासाचे अध्यक्ष राजाराम कुंभार आदी उपस्थित होते.

या भव्य स्पर्धेत प्रामुख्याने महाड, पनवेल, खोपोली, खालापूर, कर्जत, उरण, पनवेल येथील १३०हून अधिक पुरुष व महिला कुस्तीपटूंनी सहभाग नोंदविला. सर्व गटातील कुस्तीपटूंनी आपले कौशल्य पणाला लावून स्पर्धेची रंगत वाढवली. एकाहून एक सरस कुस्त्यांचा थरार खिळवून ठेवणारा होता. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना रोख रकमेसह पदक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कुस्तीत राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या क्षितिजा मरागजे, सोहेल शेख, प्रांजली कुंभार आणि श्रुती श्रीनाथ यांचा या वेळी विशेष सन्मान करण्यात आला.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कुस्ती प्रशिक्षक संदीप वांजळे, क्रीडा प्रशिक्षक जगदीश मरागजे, अमित विचारे आणि कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार न्यासाच्या सर्वच कुस्तीपटूंनी मेहनत घेतली.

# 'आरडीसीए'तर्फे मुलींचे सराव शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने ऑगस्ट महिन्यात १५ वर्षाखालील मुलींची आंतरजिल्हा निमंत्रित निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) चा संघदेखील सहभागी होणार आहे. स्पर्धेच्या पूर्वतयारीकरिता आरडीसीएच्या वतीने रविवारी (दि.२१) पनवेलच्या कामोठे येथील रोशन क्रिकेट इनडोअर अकॅडमीमध्ये सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील एकूण ३६ मुलींनी सराव शिबिरात सहभाग घेतला.

या शिबिरात उरणचे नावाजलेले प्रशिक्षक नयन कट्टा यांनी उपस्थित मुलींना फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण याचे प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले. जिल्ह्यात मुलांच्या बरोबरीने मुलींचादेखील लेदरबॉल क्रिकेटकडे ओढा वाढत चाललेला आहे. १५ वर्षाखालील वयोगटात जिल्ह्यातील विविध क्रिकेट अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या मुलींची संख्या वाढत असल्याचे या शिबिरादरम्यान दिसून आले.

या शिबिरासाठी आरडीसीएचे सदस्य राजेश पाटील, प्रदीप खलाटे, विनय पाटील, देवदत्त शास्त्री उपस्थित होते. शंकर दळवी यांनी उत्तम नियोजन केले. एमसीएच्या स्पर्धेत सहभागी होण्याआधी मुलींचा सराव व्हावा यासाठी आरडीसीए प्रयत्नशील आहे. त्यासाठी आणखी दोन-तीन दिवस सराव शिबिराचे आयोजन करून अंतिम संघ निवडला जाईल, अशी माहिती आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी दिली.

# रोहित, विराट २०२७चा वर्ल्डकप खेळू शकतात -प्रशिक्षक गंभीर

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्याआधी प्रशिक्षक गौतम गंभीर आणि मुख्य निवडकर्ते अजित आगरकर पत्रकार परिषदेला सामोरे गेले. या पत्रकार परिषदेत गंभीर यांनी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहली या दोघांबाबत मोठे वक्तव्य केले आहे. हे दोन्ही खेळाडू २०२७च्या विश्वचषक स्पर्धेत खेळू शकतात, असे गंभीर यांनी म्हटले आहे.

गंभीर म्हणाले, रोहित आणि विराट या खेळाडूंमध्ये अजून बरेच क्रिकेट बाकी आहे. आता चॅम्पियन्स ट्रॉफी खेळवली जाणार आहे तसेच ऑस्ट्रेलियात मोठी कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. या स्पर्धांसह विराट व रोहितने त्यांचा फिटनेस कायम राखला, तर ते दोघेही २०२७च्या विश्वचषक स्पर्धेत खेळू शकतात.

# नांदगाव हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांना कराटेचा ब्लॅक बेल्ट

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे ओकिनावा शोरीन रियू कराटे डो उडेन टी कोबुजुत्सू असोसिएशनच्या वतीने क्योशी विजय चंद्रकांत तांबडकर आणि सहाय्यक प्रशिक्षक रेंशी अभिषेक गजानन तांबडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण शिबीर व ब्लॅक बेल्ट पदविका परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेत नांदगाव हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी ब्लॅक बेल्ट पटकाविला.



या स्पर्धेसाठी नांदगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, दत्तात्रेय खुळपे, सागर राऊत, महेश वाडकर यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना ब्लॅक बेल्ट मिळण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले.

स्पर्धेत मुंबई व रायगड जिल्ह्यांतील खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यामध्ये मुंबईतील आशुतोष शेखर दंडवते याच्यासह नांदगाव हायस्कूलमधील अनिह भालचंद्र जोशी, अमोघ समित दळवी व ध्रुव शिल्पा कळके यांनी चमकदार कामगिरी करून ब्लॅक बेल्ट पटकाविला.

ब्लॅक बेल्ट पटकावणारे सर्व विद्यार्थ्यांनी यापूर्वी जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर स्पर्धेत पदक मिळाले असून अमोघ दळवी याने राष्ट्रीय पातळीपर्यंत मजल गाठली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून क्रीडाप्रेमींकडून अभिनंदन होत आहे.

# सुब्रोतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा उत्साहात

**रायगड : रामप्रहर वृत्त**



राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा अलिबाग येथील पोलीस मुख्यालय मैदानावर झाली. या स्पर्धेचे आयोजन १५ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले व मुली या वयोगटात करण्यात आले होते. स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील (पनवेल मनपा वगळून) ३२ संघांनी सहभाग घेतला. साधारण ५०० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

या स्पर्धेत १५ वर्षांखालील मुलांच्या गटात हिरानंदानी ट्रस्ट स्कूल भोकरपाडा प्रथम, युईएसचे इंग्लिश मीडियम स्कूल उरण, रेड क्लिप स्कूल उलवे संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलींमध्ये शिशुमंदिर खोपोली प्रथम, एमएनआर इंटरनॅशनल स्कूल पळस्पे द्वितीय, आरकेएफ जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा तृतीय; तर मुलांमध्ये यूईएस इंग्लिश मीडियम स्कूल, उरण प्रथम, जनता विद्यालय खोपोली द्वितीय, सेंट वेल्फ्रेड हाईस्कूल शेडुंग यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

स्पर्धेत जोसेफ नदार, अहमद दादरकर, युवराज वाळवी, नमन कोळी, पल्लवी पाटील, मानसी पाटील, श्रावणी देशमुख, रिया गायकर, वेदांश कोळी, विपुल बर्गे, फरहान व समा या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

स्पर्धेसाठी पंच म्हणून पंच साहिल कांबळे, नितेश जगताप, रितेश ठाकूर, प्रथमेश पाटील, देव साटोदे, विराज देशमुख यांनी रायगड जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीने काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी ऋषिकेश साखरकर, धर्मेंद्र साटोदे, यतीराज पाटील, राकेश म्हात्रे, धनश्री गौडा आदींनी सहकार्य केले.

रायगड जिल्ह्यातील विजेते संघ आता नेरूळ (नवी मुंबई) येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विभागीय स्पर्धेसाठी या संघांना अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनुर, अंकिता मयेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# लहानग्या मुलीला घरी ठेवून दीपिका ऑलिम्पिकमध्ये

**पॅरिस** : २६ जुलैपासून सुरू होत असलेल्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारताचे ११७ शिलेदार सज्ज आहेत. भारतीय तिरंदाज दीपिका कुमारीही या स्पर्धेचा भाग असून ती १९ महिन्यांच्या मुलीला मायदेशात ठेवून पॅरिसला गेली आहे. आपल्या १९ महिन्यांच्या लेकीला भारतात ठेवून पॅरिसला गेलेली दीपिका चौथ्यांदा ऑलिम्पिकमध्ये सहभागी होत आहे. दीपिका २०२२मध्ये एका मुलीची आई झाली. ती अद्याप ऑलिम्पिकमधील तिच्या पहिल्या पदकाच्या शोधात आहे. मुलीपासून इतके दिवस लांब राहणे यामागे किती दुःख लपले आहे हे शब्दांत मांडू शकत नाही. मी मागील अनेक वर्षांपासून ज्या पदकासाठी मेहनत करत आहे त्यासाठी हा त्याग आहे. मला मुलीची खूप आठवण येते, पण त्याला पर्यायही नाही, असे दीपिका सांगते.

# अर्पित पांडेने स्व. मंगला अडसूळ स्मृती खुली बुद्धीबळ स्पर्धा जिंकली




**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिनानिमित्त आयोजित स्व. मंगला आनंदराव अडसूळ स्मृतीचषक खुली जलद बुद्धीबळ स्पर्धा फिडे गुणांकित बुद्धीबळपटू अर्पित पांडेने जिंकली. सातव्या साखळी फेरीपर्यंत सर्व सामने जिंकणाऱ्या अर्पितने निर्णायक आठव्या फेरीमध्ये सावध खेळ करीत रचित गुरनानी विरूद्ध २८व्या मिनिटाला बरोबरी साधली आणि सर्वाधिक ७.५ साखळी गुणांसह अजिंक्यपदाला गवसणी घातली.

विजेत्या अर्पित पांडेला रुपये १० हजार पुरस्कारासह विजेतेपदाचा स्व. मंगला अडसूळ स्मृतीचषक देऊन माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ यांनी गौरविले. या वेळी को-ऑप. बँक एम्पलॉईज युनियनचे कार्याध्यक्ष विष्णू तांडेल, खजिनदार प्रमोद पार्टे, मुंबई शहर बुद्धीबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी उपस्थित होते.

द्वितीय पुरस्कार फिडे गुणांकित बुद्धीबळपटू रचित गुरनानीने (६.५ गुण) पटकाविला. अरविंद अय्यरने (६.५ गुण) तृतीय, फिडे मास्टर मिथिल आजगावकरने (६.५ गुण) चौथा, अनिरुद्ध पोतवाडने (६ गुण) पाचवा, अनिकेत बापटने (६ गुण) सहावा, वंश अग्रवालने (६ गुण) सातवा, जीत शाहने (६ गुण) आठवा, गुरुप्रसाद कुळकर्णीने (६ गुण) नववा, सोहम पवारने (६ गुण) दहावा, योहान बोरीचाने (६ गुण) अकरावा, तर फिडे मास्टर वेदांत नगरकट्टेने (५,५ गुण) बारावा पुरस्कार मिळविला.

## शालेय बुद्धीबळ स्पर्धेत देवांश, नील, रेयांश विजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिनानिमित्त झालेल्या स्व. मंगला आनंदराव अडसूळ स्मृतीचषक ८, १०, १२ वर्षाखालील शालेय बुद्धीबळ स्पर्धेत मुलांमध्ये देवांश घाडीगावकर, नील भट, रेयांश जैन यांनी अपराजित राहून सर्वाधिक पाच साखळी गुणासह निर्विवाद विजेतेपद पटकाविले. सरदाना मिरी, शानया दोशी, आस्या चव्हाण यांनी मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

या स्पर्धेत माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ यांचा संयुक्तपणे गौरव करण्यात आला.

पान ७ वरून

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | 246 | Private | wet | 0.065 | Padubai Dagdu Haraba, Narayan Dagdu Haraba, Krushna Dagdu Haraba, Jana Dagdu Harba, Hirabai Keshav haraba, Suraj Keshav Haraba Other Rights:- Boja 32 G Yashvant Aabaji Bhat Rs.319.99/- (246) |
| 21 | 73/1/A | Private | wet | 0.015 | Narayan Dhondu Dandekar, Pandurang Dhondu Dandekar, Hansabai Hari Sajekar, Janibai Damu Malusare Other Rights:- Boja 32 G Yashvant Abaji Bhat Rs.255.33/- (73/1/A) |
| 22 | 73/1/B | Private | wet | 0.085 | Maruti Govind Gankar, Other Rights:- boja 32 G Yashvant Abaji Bhat Rs-285.58/-, Varas - Anant Govind Gankar (73/1/B) |
| 23 | 73/1/Ch/1 | Private | wet | 0.025 | Bhagoji Manya Gankar, Vithoba Manya Gankar, Kanu Manya Gankar, Savitribai Malu Ganekar, Ganapat Malu Ganekar, sahadev Malu Ganekar, Dinesh Malu Ganekar, Sujata Ramchandra Ganekar, Abhiraj Ramchandra Ganekar, Abhishekh Ramchandra Ganekar, Karuna Keshav Patil Other Rights:- Boja 32 G Yashvant Abaji Bhat Rs.218.58/- (73/1/Ch/1) |
| 24 | 73/1/Ch/2 | Private | wet | 0.01 | Mahadu Daji Gankar Other Rights:- Boja 32 G Yashvant Abaji Bhat Rs.246.54/- (73/1/Ch/2) |
| 25 | 74/1 | Private | wet | 0.03 | Savita Narayan Tandlekar, Hashi Narayan Tandlekar, Kunda Narayan Tandlekar, Laxmi Vitthal Tandlekar, Sarita Vitthal Tandlekar, Eknath Vitthal Kadav, Namita Nathuram Mankar, Naresh Narayan Tandlekar, Damu Vitthal Tandlekar, Manda Vitthal Tandlekar, Jayvanti Dhondu Tandlekar, Suresh Dhondu Tandlekar, Prakash Dhondu Tandlekar, Janu Sonya Tandlekar, Umesh Dhondu Tandlekar, Rukmini Vitthal Devkar, Jani Hari Dandekar, Aanandi Mahadu Karambale Other Rights:- Boja 32 G Yashvant Abaji Bhat Rs.369.88/- (74/1) |
| | | | **Total** | **1.488** | |

[F. No. 12037/30/2017-MAH-P6/3D]

ABHAY JAIN, Dy. Secy.

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/३०/८१८/२०२४

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com